मराठी पॉकेट बुक्स

ग. दि. माडगूळकर

मराठी पॉकेट बुक्स

४

निवडक कथा : १

ग. दि. माडगूळकर

संपादक : राम कोलारकर

ग. दि. माडगूळकर

यांचे प्रकाशित कथासंग्रह

लपलेला ओघ

वेग

बोलका शंख

कृष्णाची करंगळी

बांधावरल्या बाभळी

तुपाचा नंदादीप

मंतरलेले दिवस

थोरली पाती

चंदनी उदबत्ती

भाताचे फूल

सोने आणि माती

ग. दि. माडगूळकर

निवडक कथा

भाग १

मराठी पॉकेट बुक्स

प्रकाशक : किशोर कोलारकर
मराठी पॉकेट बुक्स करिता
४३।२४८, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे १८.

प्रथमावृत्ती : दिवाळी, १९७७

मुद्रक : सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय, २७१ नारायण पेठ, पुणे ३०.

कथाकार माडगूळकर

'श्री. ग. दि. माडगूळकरांची कुठली कथा मला प्रथम आवडली ? मला स्पष्ट आठवते, त्यांची 'सिनेमातला माणूस' ही कथा मला प्रथम आवडली. त्यांच्या 'लपलेला ओघ' ह्या पहिल्याच कथासंग्रहात ही गोष्ट समाविष्ट केलेली आहे. ही गोष्ट मी वाचली आणि मनाशी खूणगाठ बांधली की ह्या लेखकाकडून उत्तम गोष्टींची अपेक्षा करावयास चिंता नाही. उत्तम कथालेखकाला आवश्यक असे अनेक गुण ह्या लेखकाचे ठायी आहेत. ह्या लेखकाची लेखणी सूक्ष्म आहे, उत्कट होऊ शकते, सखोल आहे, रसाळ आहे. ह्या लेखकापाशी स्वतःची अशी एक भाषा-शैली आहे... त्यांच्याकडून थोर कर्तृत्वाची अपेक्षा मी करीत होतो. 'सिनेमातला माणूस' आणि 'वीज' ने माझ्या मनात ही अपेक्षा उत्पन्न केली होती... त्यापेक्षाही मोठ्या कथांची वाट मी त्यांच्याकडून पहात होतो... 'कृष्णाची करंगळी' ह्या उत्तमोत्तम गोष्टींनी सजलेला त्यांचा कथासंग्रह प्रकाशात आला. तो संग्रह मी कुठेही न थांबता अथ-पासून इतिपर्यंत वाचून काढला... 'माडगूळकर नुसते पद्यलेखक आहेत की कवी ?' हा वाद चालू असताच माडगूळकरांच्या बहुरंगी प्रतिभावृक्षावर आणखी एक फूल उमलले होते. ते फूल सुगंधी व सुरंगी कथालेखनाचे होते...अनेक व्यापातून वेळ काढून कौतुकास्पद निष्ठेने त्यांनी कथालेखन केले. मोठ्या संख्येने व मोठ्या गुणाने कथालेखन केले... त्यांची कथा बोलावयाचे तितके बोलते. जिथे बोलणे संपते त्यापुढचेही कितीतरी सांगून जाते. आणि हे सारे सांगणारी त्यांची भाषा अतिशय प्रसन्न आहे. अतिशय शुद्ध आहे. हिरव्या रानातून खळाळत येणाऱ्या निवळशंख निर्झराप्रमाणे माडगूळकरांच्या भाषेचे रूप आहे...चार सामान्य मराठी लेखकांपेक्षा माडगूळकरांच्या अनुभवांचे विश्व अधिक मोठे आहे...'

—पु. भा. भावे

['थोरली पाती' च्या प्रस्तावनेतून—]

अनुक्रम

✡

काशीयात्रा

पन्नास-साठ वर्षांपूर्वीची गोष्ट. महाराष्ट्रातील खेड्यात तेव्हा मध्ययुगच नांदत होते. ऋतुचक्राने एक वळसा पुरता घेतला. पुन्हा श्रावण महिना आला. गावाबाहेरचे विटके माळ पुन्हा हिरवाळून आले. गावदरीची राने पुन्हा वाढीला पडली. गावातल्या घाणेरड्या रस्त्यांच्या कडा दुर्वांनी खचून गेल्या. माळवदावर देखील हराळी मातली. लिंबा-बाभळींचा पानपसारा अधिक तजेलदार झाला. चिंचांच्या झाडांवर नखाएवढी फळे लटकू लागली. बारा महिने रखरखीत भासणारा माणदेश इथून तिथून ओलावला. गावातल्या गायकवाडांच्या पडक्या वाड्याच्या जुनाट भिंती पावसाचे पाणी पिऊन फुगल्या. कित्येकींच्या अंगी गवताचे पोपटी अंकुर फुटले.

परसातल्या जास्वंदीवर लालभडक रंगाची फुले उमलू लागली. आडा-जवळच्या ओसाडीत तेरड्याची झाडे तरारली. त्यांची रंगीबेरंगी फुले खदखदून हसू लागली. उकिरडे देखील हिरवेगार झाले. चिमुकल्या मिटुकल्या निनावी फुलांनी त्यांचे किळसवाणे देह झाकून टाकले. कडक्या उन्हांना कोंबटपणा आला. सारे काही शीतळले. सारे काही उजळले.

गावामध्यावरल्या टोलेजंग वाड्यात नांदणाऱ्या राधाबाई मात्र होत्या तशाच होत्या. श्रावण आला म्हणून त्यांच्या चेहऱ्यावर टकळाई आली नाही की डोळ्यात आनंदाचा कवडसा चमकला नाही. उपासतापास बारमहाच करीत. श्रावणामुळे ते आणखी वाढले.

राधाबाईंची अंगलट मूळची सुडौल. या उपासतापासांनीच गेल्या चारपाच वर्षांत त्या वाळल्या होत्या. त्यांच्या अंगकांतीच्या केतकीला कसलीतरी कीड लागली होती. रंगाच्या रसरशीतपणाला वाळकुंजी कळा

झाली होती. त्या उदास होत्या.

तसे राधाबाईंना काही कमी होते असे नाही. घरात तीन गावचे कुळकर्ण होते. काशिनाथपंतांची कमाई चांगली होती. पंचक्रोशीत त्यांच्या नावाविषयी आदर होता. सरकारी दरबारी 'वजन' चांगले होते. वांझोटेपण होते असेही नाही. त्या दांपत्यापोटी तीन मुली जन्माला आल्या होत्या. मोठी गोदा न्हाती-धुती झाली होती. बनी, चनी अजून हदगा नाचण्याच्याच वयात होत्या. मुली थोड्या बापाच्या रंगरूपावर उतरल्या होत्या. हुंडागोंडा देऊन त्यांना उजविता येईल इतकी ऐपत त्यांना खास होती.

नाही म्हणायला थोरली गोदी त्या काळच्या रीतीप्रमाणे गळ्याला आली होती. तिला पंधरावे लागले होते. ती पोरगी ठार मुकी होती, पण काशिनाथपंतही मोठा जागा माणूस होता. आपले नाणे पुऱ्या मोलाचे नाही याची त्यांना जाणीव होती. त्यांनी तिच्या लग्नाचे जवळ जवळ जमवीत आणले होते. घाटावरच्या कुणा भिक्षुक घराण्यातील एक मुलगा त्यांनी हेरला होता. हुंड्यापोटी पिकता मळा जावयाच्या नावावर करून देण्याचे अभिवचन त्यांनी दिले होते. तिचे लग्न ठरल्यासारखेच होते. राधाबाईंची ती काळजी जवळजवळ मिटल्यातच जमा होती. तरीही त्या उदास होत्या. निराश होत्या. यापुढे आपल्याला अपत्य होणार नाही हे त्यांनी हेरले होते. पहिली पहिली मुले बालपणीच गेल्यामुळे मुले लहान होती; पण त्या मात्र प्रौढ झाल्या होत्या. आपल्याला साऱ्या मुलीच आहेत, वंशाला दिवा नाही, असले काही दुःख त्या वागवीत होत्या म्हणावे तर तसेही नव्हते. थोरल्या दिराचा मुलगा दिगंबर त्यांनी त्याच्या जन्मापासून आपल्या ओटीत घेतला होता. तो त्यांचा पुतण्या आहे, मुलगा नव्हे असे कधी कुणालाच वाटले नव्हते. तो दिगंबर पंढरपूरला जातो म्हणून गेला होता आणि अद्याप परतला नव्हता हे एकच दुःख त्यांना करपवीत होते. जाळीत होते.

दिगंबरची आई त्याला जन्म देताच देवाघरी गेली होती. वडिलांनी फक्त त्याला जावळातच पाहिला होता. त्यांनीही त्याचे बाळपण खेळवले नाही. तो वाढला राधाबाईंकडेच. त्या दिगंबरला जाऊन आता चार वर्षे

झाली होती. चार सालांपूर्वी तो आखाड महिन्यात गेला होता. काशिनाथ-पंतांनी शोध करण्याचे प्रयत्न आटोकाटपणे करून पाहिले होते. आता दिगंबराचा विषयच बोलायचा नाही असे ठरवून दैवी आलेली निराशा त्यांनी निश्चयाने पचविली होती. पतीच्या आज्ञेची पाणरेघ देखील न ओलांडणाऱ्या राधाबाईंनी गेल्या वर्षभरात दिगूची आठवण बोलून दाखविली नव्हती; पण त्या उदास होत्या, निराश होत्या. त्यांच्या काळजात बारमहा उन्हाळा रखरखू लागला होता, मन कोळपले होते.

श्रावणाच्या हिरव्या आगमनानेही त्यांचे मन अंकुरले नाही. वाळून चोथा झालेली आशा काही केल्या हिरवळली नाही. त्या वावरत होत्या, नित्याची कामे करीत होत्या, बोलत होत्या, चालत होत्या. पण सारेच कसे मागून आणल्यासारखे चालले होते.

दिगंबर आता येणार नाही याविषयी त्यांचीही आता खात्री पटली होती. निराशेच्या काजळपसाऱ्यात एकच दिवटी मिणमिणत होती. राधाबाईंना एक ईश्वरी देणगी होती. पुढे घडणाऱ्या गोष्टी त्यांना अचूकपणे आधी कळत. ध्यानीमनी नसताना त्यांना बोलकी स्वप्ने पडत आणि ती भवितव्याची अचूक चाहूल देत असत. आपली ही अनुभूती त्या कधी कुणाला सांगत नसत, पण समजेल त्या मार्गांनी दुसऱ्यांना सुचवून ठेवीत असत. गोदीच्या वेळी गरोदर असताना त्यांना स्वप्न पडले होते...आपली मोठी गाय व्यायली, तिला कालवड झाली, पण त्या कालवडीच्या तोंडावर जन्मतःच काटेम्होरकी आवळलेली आहे. त्यांनी ते स्वप्न त्यावेळी काशिनाथपंतांना किंवा घरातल्या कोणा वडील मंडळींना सांगितले नव्हते. त्यांना स्वतःला मात्र मनोमन वाटले होते की, आपल्याला मुलगी होणार आणि ती आमरण मुकी राहणार. त्या कल्पनेने त्यांना घाबरवून सोडले होते. पुढे झाले होते ते अगदी त्या स्वप्नाबरहुकूम झाले होते. मुकी गोदा आता लग्नाला आली होती.

मागे एकदा काशिनाथपंतांवर काही सरकारी किटाळ आले होते, त्याच्यापूर्वी सहा एक महिने राधाबाईंना स्वप्नात दिसले होते की, आपल्या नवऱ्याच्या बंडीचा बंद तुटला आणि कधी नव्हे ते ते आपल्यावर संतापले, कडाडले. त्यांनी आपल्यावर हातदेखील उगारला,

पण मारले नाही.

असली एक का अनेक स्वप्ने त्यांना आठवत होती, पण आजकाल त्या स्वप्नांनीही त्यांच्याकडे पाठ फिरविली होती. दिगंबरचा विचार त्या सारख्याच मनी-मानसी वागवीत होत्या आणि तरीही त्यांना दिगंबर-विषयीचे स्वप्न पडत नव्हते. खरं तर त्याचा चेहराच त्या विसरल्या होत्या. एखाद्या दिवशी तो आला तर आपण त्याला ओळखू की नाही, असला वांझ विचार त्यांना उगीचच छळत होता. 'दिगंबरच्या नाहीसे होण्याने त्या कायमच्या अस्वस्थ झाल्या होत्या.

त्या दिवशी आदित्यवार होता. श्रावणातल्या आदित्यवारी राधाबाई एक व्रत नित्यनेमाने करीत आल्या होत्या. प्रात:काळी उठल्याबरोबर स्नान होईतो मौन धरायचे. स्नानोत्तर सूर्याची पूजा करायची. घरातल्या मुलाबाळांना जमवायचे. त्यांच्या सर्वांच्या हाती तांदळाचे तीन तीन दाणे द्यायचे. आपण तीन घ्यायचे. एकाग्र चित्त करून आपण रविवारची कहाणी सांगायची. एकाग्र चित्त करून मुलाबाळांनी ती ऐकायची.

आजही माजघरातल्या घुसळखांबाशी बसून त्या कहाणी सांगत होत्या. ध्वनीबरोबर मुकी बहिरी गोदावरीही त्यांचे कथन ऐकत होती.

सहाव्या आदितवारी सहावा मुलगा उठला. तळ्याच्या काठी येऊन उभा राहिला. अग अग दासींनो, तुम्ही दासी कुणाच्या? आम्ही दासी प्रधानाच्या. प्रधानाच्या राणीला सांगा... 'तुमच्या बहिणीचा मुलगा आलाय.' 'आलाय! काय आलाय!' बाहेर कुणाचा तरी आवाज आला आणि राधाबाई थोडक्या थांबल्या. माजघराच्या चौकटीतून एक तरुण पुरुष आत आला. उंच आणि सडपातळ. हनुवटीच्यावर कोवळी दाढी वाढलेली. मिशांचा रेशमी मऊपणा दाढीशी येऊन मिसळलेला. अंगा-वर भगवी छाटी. हातात कुबडी, राधाबाईंनी ते डोळे ओळखले. कहाणी अर्धी सोडू नये ही व्रताची मर्यादा त्यांना आडवू शकली नाही. सर्वांग थरथरल्यासारखे होऊन त्या आवेगाने उभ्या राहिल्या. झेपावत गेल्यासारख्या त्या तरुणाकडे धावल्या. तोही थोडा पुढे आला. मायलेकांची मिठी आली. तरुण डोळ्यांच्या कोरीत थबकलेल्या अश्रुबिंदूंनी समोरच्या

प्रौढ डोळ्यांतून झरणाऱ्या धारा एकटक पाहून घेतल्या. चनीबनीच्या डोळ्यांत लख्ख प्रकाश पडला...झिम्म्यातल्या टाळीगत टाळी मारीत त्या दोघी ओरडल्या, ' दिगूदादा, दिगूदादा. ' मुक्या गोदीचे डोळे मुकेपणानेच ओरडले...' दिगूदादा... दिगूदादा...'

खरोखरीच दिगूदादा आला होता. चार वर्षांनी परत आला होता. थोरला होऊन माघारी आला होता. पोराचा पुरुष झाला होता. पण तो आता प्रापंचिक राहिला नव्हता. मानलेल्या आईचे मानलेले नाते जणू त्याने तोडून टाकले होते. सख्खेपणाला लाजविणाऱ्या चनीबनीच्या नात्याशीही रामदासी दिगंबराचा कसलाच संबंध उरला नाही. काशिनाथपंतांची हरवलेली काठी अचानकपणे गवसली होती. त्या काठीने संन्याशाच्या दंडाचा वेष घेतला होता. काशिनाथपन्तांचे हात त्याला धरू धजणार नव्हते. मुलगा भेटला; पण रामदासी होऊन. वैराग्याची वस्त्रे पांघरून. वास्तविक मुलगा आला या घटनेने ते मलूल झाले. उताला यावा तो आनंद आतल्या आत नासून गेला. साऱ्या दुधाण्याचीच रया गेली. गावकऱ्यांच्या झुंडी भेटायला आल्या. गावातल्या आयाबाया बघायला आल्या. शेजारपाजारच्या गावांतले सगेसोयरे खबर मिळताच टाकोटाक येऊन बसले. दिगंबर सर्वांना भेटला. नुसते हसला. बोलला फारसे नाही. सारे संभाषण त्याने एकाच वाक्यात गोठवून टाकले होते...

' जय जय श्रीराम. '

अनेकांनी अनेक तऱ्हेने विचारले. दिगंबर बोलता झाला नाही. चार वर्षांत काय व कसे घडले ते त्याने कुणालाच सांगितले नाही. राधाबाईंनी तीन रात्री रडून काढल्या. काशीनाथपन्तांनी अनेकदा पाठीवर हात फिरवीत त्यांना समजावले...जे पोटी आले नाही ते हाती कुठून येणार? किती रडाल?

दिगंबर देवाचा होता. देवानं त्याला आपला केला. तो आला यात सारे मिळाले...राधाबाईंचे डोळे कोरडे झाले, पण त्यांच्या नाकपुड्यांतील कापरा वारा कापतच राहिला. गळ्यातला आवंढा बोलणे, भाषण अडवीतच राहिला.

चवथ्या दिवशी रामदासांचा एक जथाच्या जथा दरवाजाशी आला.

चंदनी ओवरीवर येऊन ठेवला. देव्हाऱ्यात रामसीता-लक्ष्मणाच्या देखण्या प्रतिमा बसविल्या. उजाडल्यापासून मध्यरात्रीपर्यंत सोहळे सुरू झाले. भूपाळ्या, पूजा, आरत्या, श्लोक, सवाया, दासबोधाचे पाठ अखंडपणे दुमदुमू लागले.

त्या भाविक जोडप्याच्या वाड्याचा जणू सज्जनगड झाला. गावकरीही भक्तीने जमू लागले. राधाबाई दुःखीकष्टी होत्या तरी मन लावून साऱ्यांचे करू लागल्या. दिगंबर तर रामनामाशिवाय अक्षर बोलत नव्हता. त्याचे साथीदार गात होते, नाचत होते. दिवसातून दहादा दिगंबराच्या पायावर डोकी ठेवीत होते. ते कोण होते तेही काशिनाथांच्या कुटुंबियांना कळले नाही. त्यांची बोली वेगळी होती. मराठीसारखी वाटे, पण ती मराठी नव्हती.

आयाबाया विचारू लागल्या की राधाबाईच्या जिवाची तल्खील होत राही. चनीबनी बावरलेल्या चिमण्यांसारख्या दुरून दुरून भिरभिरत. गोदी आचारी का बिचारी होई. काशिनाथपंत सारे भिजऱ्या डोळ्यांनी पहात राहात. कुणाला काहीच कळले नाही. बरोबरची मंडळीही रामानंदी. त्यांनी काही म्हटल्या काही सांगितले नाही. स्नाने, संध्या, भोजनपंक्ती सारे होत राहिले पण दिगंबर रामदासी कसा झाला हे कुणालाच कळले नाही. विचारणेही कुणाला साधले नाही.

एके दिवशी पूजा आटोपली. आरत्या, सवाया सरत्या झाल्या; आणि शिष्यांनी मूर्ती उचलल्या. देव्हारा हालवला. वळकट्या बांधल्या जाऊ लागल्या. यात्रा हालल्याची चिन्हे अचानक दिसू लागली.

मग मात्र राधाबाईच्याने रहावले नाही. त्यांनी पटकन् अत्यावेगाने जाऊन दिगंबराचे पाय धरले. काकुळतीची परमावधी करून त्या म्हणाल्या, ' दिगंबर, नको रे जाऊस. असाच का होईना, पण इथे रहा. अनाथ होतास म्हणून तुला पदराखाली घेतला. अनाथाचा सनाथ केला. तू आम्हाला अनाथ करू नकोस ! '

ध्यानस्थ दिगंबराने डोळे उघडले. थोडेसे हसल्यासारखे केले. बस्स, एवढेच ! तो काही बोलला नाही. राधाबाई गहिवरल्या अंगाने किती वेळ उभ्या राहिल्या. दिगंबराने परत डोळे मिटून घेतले. तोंडावर पदर

घेऊन राधाबाई त्वरेने आत गेल्या. बाळंतघराच्या अंधारीत जाऊन बसल्या. त्यांच्या आसूंचे ओहळ जणू काळजाच्या समुद्राला मिळाले.

'जय जय श्रीराम' दिगंबर मोठ्यांदा ओरडला. सेवकवृंद गोळा झाला. हाताच्या खुणेनेच त्याने प्रस्थान रहित केले. जथ्यातील मंडळींच्या बांधलेल्या वळकट्या मोकळ्या झाल्या. देव्हारा जाग्यावर आला. मूर्ती परत विराजमान झाल्या. पुनः सुरू झाले... भूपाळ्या, पूजा, आरत्या, श्लोक, सवाया, दासबोधाचे पाठ ...

राधाबाई सर्वांचे करू लागल्या. काशिनाथपंत अबोलपणे पाहू लागले. चनीबनी धरून आणल्यागत बसू लागल्या. गोदी आईच्या मदतीत रमली. वाड्याच्या दरवाज्याला साऱ्या गावाचे पाय लागू लागले. दिगंबरच्या पायावर अनेकांच्या भाग्यरेखा उजाळा घेऊ लागल्या. कुणी न सांगताच सारी लहानथोर मंडळी दिगंबराच्या नावाचा उल्लेख दिगंबर बुवा असा करू लागली. राधाबाईंच्या मनात सुख आणि दुःख यांची दोन झाडे चढाओढीने वाहेर वाढू लागली.

एका संध्याकाळी परसातल्या तुळशी कट्ट्यावर राधाबाई एकट्याच बसल्या होत्या. ओसरी व परसू यात खूपच अंतर होते. बाहेरचा शब्द आत येईल असे नव्हते. राधाबाईंचे मस्तक रिते झाल्यासारखे झाले होते. त्या बसल्या होत्या. वाऱ्याला बसावे म्हणूनच बसल्या होत्या. पण वाऱ्याच्या झुळका त्यांना जाणवत नव्हत्या. समोरच्या दारातून दिगंबर आत आला. राधाबाई वेड्यागत त्याच्याकडे नुसत्या बघत राहिल्या. त्यांनी बैस म्हटल्याने तो बसणार नव्हता. विचारल्या प्रश्नाचे उत्तर त्याच्याकडून मिळणार नव्हते. त्या बोलल्या का जागच्या हालल्या नाहीत. एखाद्या चित्राकडे पहात राहावे तशा त्या केवळ बघत राहिल्या. पाहता पाहता त्यांच्या डोळ्यांची भिंगे भिजली. कडा पाझरू लागल्या. गळ्यातून गहिवर झरू लागला. ओठ थरारले. त्या बोलल्या नाहीतच. कटाक्षाने बोलल्या नाहीत. मुलगा रामध्यानी झाल्याची जाणीव पदोपदी त्यांना गोदीच्या अवस्थेत नेऊन ठेवीत होती.

'आई' – दिगंबर होऊनच बोलला.

जणू किती जन्मानंतर राधाबाईंनी दिगंबरची ती हाक ऐकली.

डोळ्यांतले पाणी गालांवर ओघळले. अडलेल्या गहिवराचा एक चमत्कारिक सूर फुटला. काळजाचा कंद हरपाकळीने उमलून आला. तरी त्या बोलल्या नाहीत. कटाक्षाने बोलल्या नाहीत.

रामदासी दिगंबर आईच्या शेजारी बसला. पुनः त्याने हाक मारली, 'आई-'

लग्न ठरत असल्याचे कळले तेव्हा गोदीची अवस्था झाली होती तशी काहीशी अवस्था राधाबाईंची झाली. मुलाने आपण होऊन आईच्या पाठीवर हात ठेवला. सारी दुःखे शीतळली. सारी शल्ये बोथटली. सारे काही मिळाले.

'आई—'

'दिगंबर ! दिगू—'

'मला आता गुंतवू नकोस. मला गेलं पाहिजे !'

'कुठं जाणार तू ?'

'काशीयात्रेला.'

राधाबाईंना लाखो प्रश्न विचारायचे होते. त्यांनी काहीच विचारले नाही. उत्तरे मिळणार नाहीत ह्याची त्यांना खात्री होती. मायलेकरे दोघेही गप्प झाली. एकाएकी अवसान आल्यासारखे करून राधाबाई म्हणाल्या... 'दिगू'

दिगूने त्याच गूढ डोळ्यांनी आईकडे पाहिले. राधाबाईंचा प्रश्न मात्र थबकला नाही. फेकलेले फूल नेमके देवावर पडावे तसे एक वाक्य त्यांच्या तोंडून दिगंबरच्या कानी पोचलेच पोचले...

'मला घेऊन चल काशीयात्रेला...'

'म्हणजे ?'

'म्हणजे मुलगा म्हणून तुझं कर्तव्य संपलं.'

'ठीक—कर तयारी. आठवड्याभरानं निघायचं.'

दिगंबर निघून गेला. आदित्यवाराच्या कहाणीतील महारोग्यासारखा राधाबाईंचा सारा देह जणू सुवर्णाचा झाला. वसा घेतल्याचे फळ मिळाले. साती दरवाजे उघडले. साऱ्या शरीरात लख्ख प्रकाश पडला.

गोदीच्या लग्नाचा प्रश्न देखील न काढता काशीनाथपंतांनी राधाबाईंना

अनुमती दिली. 'चनी—बनीला गोदी सांभाळील.' या पत्नीने सुचविलेल्या व्यवस्थेवरही त्यांनी शंका घेतली नाही. राधाबाई मुलाबरोबर काशीयात्रेला निघणार हे निश्चित झाले. शेजारपाजारणी फराळाचे करण्यासाठी जमू लागल्या. घरातल्या अखंड नामसंकीर्तनामुळे बावरून गेलेल्या छोट्या पोरांनी बरोबर येण्याचा हट्ट धरला नाही.

गावकऱ्यांनी एक विचार केला. दिगंबरबुवांना थाटाचा निरोप द्यायचे ठरले. आता मात्र राधाबाईंना सत्पुरुषाची आई झाल्याचा आनंद हळुवारपणे कुरवाळू लागला. त्या सुखावल्या. प्रपंचाचा काच त्यांना कळेनासा झाला. लेकाच्या मागे त्याही परमार्थाच्या पायरीशी पोचल्या. काशीयात्रेची सिद्धता मोठ्या हौसेने करू लागल्या.

चांदणं टिपूर पडलं होतं. घर झोपी गेलं होतं. गाव निद्राधीन झालं होतं. एकट्या राधाबाई जाग्या होत्या. सत्पुरुष झालेल्या मुलाबरोबर काशीयात्रा करण्याचं भाग्य त्यांच्या कानाशी सारखं गीत गात होतं. मनाचे श्लोक सादवीत होतं. एकाग्र चित्ताने त्यांचं ते संकीर्तन ऐकत राधाबाई तुळशीकट्टयावर बसल्या होत्या. स्वतःजवळ बसण्याची त्यांची तीच एक जागा होती. मंजिरींनी डवरलेलं तुळशीचं रोपटं भलं मोठं होऊन छायारूपानं समोरच्या भुईवर आंदोळत होतं. एकाएकी परसाच्या दाराची कडी कुणीतरी बाहेरून खटखटावली.

'कोण आहे ?' अवेळ झाली आहे हे मुळीच ध्यानी नसल्याने राधाबाईंनी सहज उठत प्रश्न केला.

'मी.'

तुळशीवृंदावनाकडून दारापर्यंत जाताना राधाबाईंना स्वच्छपणे वाटलं गोदी असावी. दिगंबर आला. माझ्याशी बोलला. मला काशीयात्रेसाठी बरोबर न्यायला तयार झाला. गोदीला वाचा का नाही फुटणार! पण इतक्या रात्री ती बाहेर कशाला जाईल! भल्या भ्रमिष्टपणाने राधाबाईंना भारून टाकलं होतं. त्यांनी आडणा ओढला, कडी काढली. दार उघडे करण्याच्या आधी विचारलं.

'कोण ग ?' म्हणत दारं उघडी केली.

त्या मनोहर चांदण्यात एक मनोहरच मुद्रा त्यांच्या समोर आली.

‘ प्रयागा ? ’

‘ हं ! ’

‘ का ग ! इतक्या रात्री ? ’

बाबा वाण्याची प्रयागा आत आली. ती एक पांढरं शुभ्र पातळ नेसली होती. चांदणंच नेसून आली की काय असं बघणाऱ्याला वाटावं. राधाबाई पुढे आणि प्रयागा मागे. दोघीही तुळशीकट्ट्याकडे आल्या. राधाबाईंनी वळून पाहिले. प्रयागाचे पांढरे शुभ्र दात चांदण्या चमकल्या-सारखे चमकले. ती हसली. राधाबाई आणखी पुढे झाल्या. ती पाठोपाठ आली. प्रयागाच्या कमरेखालच्या पुष्ट भागावर काही तरी झळाळले. सोनसाखळीत गुंतविलेले तिच्या गळ्यातले सोन्याचे लिंग तिथपर्यंत लोंबत होते ! ते चमकले.

प्रयागा गावच्या धनिक वाण्याची एकुलती एक लेक. बिचारी विधवा झालेली होती. नक्षत्रासारखे तिचे रूप अनाघ्रातच राहून गेले होते. वयाने तिशी उलटली तरी तिची अंगलट लोभसवाणीच राहिली होती. राधाबाईच्या घराखेरीज ती गावात कुठं जात येत नसे.

दोघीही तुळशीकट्ट्यावर बसल्या.

‘ कधी निघणार यात्रेला वैनी ? ’ प्रयागाने विचारले.

‘ परवा म्हणतायेत बाई — ’

‘ मला नेणार का ? बाबांची परवानगी आहे. ’

‘ काशीयात्रेला ? ’

‘ मग काय करू तर ! ’ प्रयागा ते वाक्य असे काही बोलली की, तिच्या तनामनाची सारी व्यथा राधाबाईच्या आनंदावर एकाएकी ढगाळून आली. त्या थोडावेळ गप्प बसल्या. प्रयागाचे डोळे पाणावले. तिने पदराच्या शेवाने आपल्या नाकपुड्या साफ केल्या.

‘ वैनी ? ’ प्रयागाच्या डोळ्यांत चांदणे झाकळले. राधाबाईंना शिवलीलामृतातील हरिणी आठवल्या.

‘ विचारते. ’ त्यांची सहानुभूती पटकन् बोलून गेली.

‘ स्वामींना ? ’ उल्हसित होऊन प्रयागाने प्रश्न केला.

आपल्या दिगंबरचा उल्लेख स्वामी म्हणून झाल्याचे ऐकून राधाबाई

उगीचच बावरल्या. कसल्यातरी अभिमानाने तो बावरेपणा हिरीरीने बाजूला सारला. अभिमानी पण करुणार्द्र स्वरात त्यांनी निःशब्द वचन देऊन टाकले —

'हं —'

प्रयागानं तारांकित आभाळाला हात जोडले. डोळे मिटले. भावपूर्ण आवाजात ती म्हणाली – 'त्या सत्पुरुषाच्या बरोबर काशीयात्रा घडली म्हणजे कुडीचं सार्थक झालं. काशीविश्वेश्वरानं करावं एवढं.'

'फार उशीरा सांगितलंस – '

'त्यात काय! एक दिवसात तयारी होईल. तुम्ही विचारलंत तर नाही म्हणणारच नाहीत स्वामी. –'

प्रयागा निघून गेली. तरी पुष्कळ वेळ राधाबाई तुळशीकट्ट्यावरच बसून होत्या. प्रयागा खरोखरच धुतल्या तांदळासारखी होती. बालवयात वैधव्य आलं होतं तिला, पण बोरातल्या अळीसारखी ती बापाच्या मायेतच नांदत होती. बापाच्या घरात पैसा मावत नव्हता. त्यात तिच्या सासरची लक्ष्मीही तिचा पदर धरून माहेरी आली होती. प्रयागाला ते सारं शिवनिर्माल्य होतं. अलिकडे ती रोज रामदर्शनाला येत होती. राधाबाईंना विचारून परत जात होती. त्या दुःखी, निष्पाप जिवाची काशीयात्राही आपण करविलीच पाहिजे असे राधाबाईंच्या मनाने घेतले.

भीतभीतच दुसऱ्या दिवशी त्यांनी दिगंबरला विचारले – ती कशी साध्वी आहे हे सांगायला सुरुवात केली. दिगंबर निर्विकारपणे म्हणाला – 'तुला वाटलं तर घे बरोबर. पंधरा आहोत, ती सोळावी.'

सारे गावकरी वाड्यापुढे जमा झाले होते. सारे आप्तस्वकीय अंगणात गोळा झाले होते. शिष्यांनी रामरायाची पालखी उचलली होती. अयोध्यानाथाच्या नावाचा जयजयकार चालविला होता. सामानाच्या गाड्या चालू झाल्या. दिगंबर स्वामींनी पाऊल उचलले. सत्पुरुषाची धन्य माता होऊन राधाबाईही काशीयात्रेला निघाल्या. चारी धामे आटोपून त्या तीन महिन्यानंतर परत येणार होत्या. आता निघताना परतीचा विचार त्यांच्या डोक्यात नव्हता. या जाण्याला जणू परतणे नसतेच अशा विश्वासाने त्या सर्वांचा निरोप घेत होत्या. भावकीतल्या वडिलधाऱ्यांच्या

पायांची धूळ त्यांनी कपाळावर घेतली. काशिनाथपंतांना लवून नमस्कार केला. चनीबनीला कुरवाळले. गोदीला पोटाशी घेतले. डोळे मुळीच न ओलावता हसऱ्या मुद्रेने त्यांनी सर्वांचा निरोप घेतला.

यात्रा निघाली. सामानाच्या गाड्या, रामरायाची पालखी, दिगंबरस्वामी असा क्रम आपोआपच आकारला! लेकाच्या मागोमाग आई व ती वाण्याघरची विधवा प्रयागा. यात्रा निघाली. बोलले कुणीच नाही. एक जयजयकार घुमला – जयजय रघुवीर समर्थ.

यात्रेने गाववेस ओलांडली. ओढा पार केला. यात्रेतले शेवटले प्रवासी राधाबाई आणि प्रयागा वाकणावर अदृश्य झाले, तेव्हा पोचवायला गेलेली मंडळी परत फिरली. काशिनाथपंतांचे काळीज तेव्हा उगीचच जडभारी झाले. शेवटी वळताना पत्नीने केवळ मागे वळूनही पाहिले नाही या जाणिवेने ते थोडे कष्टी झाले. काहीतरी खचल्याचा भाव उगीचच त्यांच्या मनाला पोखरू लागला.

अबोल झालेले काशिनाथपंत आणि मुकी गोदावरी राधाबाईचं घर सांभाळू लागली. नामसंकीर्तनाच्या सपाट्यात वाहून गेलेली चनीबनीची बडबड पुन्हा सुरू झाली. आईच्या आठवणीने त्या कोवळ्या पोरी वेळी-अवेळी डोळे गाळू लागल्या.

'आई कधी येणार?' हा प्रश्न वारंवार वडिलांना विचारू लागल्या. काशीनाथपंत कसल्या विचारात होते कोण जाणे, एका रात्री दरडावल्यासारख्या स्वरात त्यांनी पोरींना सांगून टाकले, 'ती आता येणार नाही.'

आई देवाला गेली, का देवाघरी गेली हे त्या चिमुरड्यांना कळेनासे झाले.

मार्गेसर महिन्यात काशीनाथपंतांनी गोदीचे लग्न उरकून घेतले. काही गाजावाजा न करता समारंभ पार पाडला. पत्नी हयात असताना त्यांच्या घरातले पहिले कन्यादान, त्यांना परहस्ते पार पाडावे लागले. त्या चिमुरड्या पोरी पोक्तासारख्या सैंपाकपाण्यात ध्यान देऊ लागल्या.

वडिलांना विचारण्याची सोयच नव्हती. आपापसातच चनीबनीची प्रश्नोत्तरे झोडू लागली.

'बने —'

'काय?'

'आई कुठं असेल आता?'

'कुणाला ठाऊक!'

'पत्र का येत नाही?'

'पाठवायचं नसतं!'

'का?'

'दिगूदादानं पाठवलं होतं का कधी पत्र?'

'पण तो आला होता.'

'मग आई देखील येईल की.'

'कधी?'

याचे उत्तर मात्र बनीला सुचत नसे.

काशिनाथपंत चार आठ दिवसांनी बाबा वाण्याच्या पेढीवर जात असत. प्रारंभी प्रारंभी त्याच्या लेकीची पत्रं आली. नाशिकाच्या मुक्कामापर्यंतची खुशाली काशिनाथपंतांना कळली. पुढे प्रयागाची तिच्या वडिलांना येणारी पत्रेही बंद झाली. यात्रेकरूंचा आणि त्यांच्या आप्तांचा संबंध तुटला. पूर्णपणे तुटला.

वैशाखी उन्हाळ्याने माणदेशावर आगीचा नांगर चालवण्यास प्रारंभ केला. गावाबाहेरचे माळ रणरणू लागले. गावाला फुफाटा भाजू लागला. कडूलिंबाला पालवी फुटली. गोडपणा म्हणून कुठे हवेत उरला नाही. एका घामेजलेल्या रात्री काशिनाथपंत आणि बाबा बोलत बसले होते. मध्यरात्र टळून गेली होती. पेढीवरच्या बैठकीवर ते बोलत बसले होते. दहावीस पाकळ्यांचा एक लामणदिवा पेढीवर लोंबकळत होता. तेल संपल्याने, त्याच्या चार पाच ज्योती क्षीण होत होत विझून गेल्या. तरी त्या दोघांची बोलणी चाललीच होती. उभ्या गुडघ्याभोवती आवळलेला उपरण्याचा जेठा सैल करीत काशिनाथपंत म्हणाले—'आमच्या हिचं ठीक आहे. नाही म्हटलं तरी ती परमार्थाच्या वयात आली आहे. पण प्रयागा—'

'ती तर बैरागीणच आहे.'

'म्हणजे?'

' अहो पंत, नवरा गेल्यापासून गोड पदार्थ तिनं ओठाजवळ नेलेला नाही. घरात एवढं ऐश्वर्य आहे. शिसवी, पितळी पलंग आहेत, पण ही झोपायची घोंगडीवर. दागिन्याला तर कधी हातच लावला नाही तिनं. गळ्यात लिंग आहे. तेवढाच सोन्याचा स्पर्श. तिजोऱ्या भरल्या आहेत. उपयोग काय ? मला नाही वाटत ती परत येईल. ती मुक्तच आहे. '

' मग ? '

' मग काय ! जावई गेला तेव्हा आपण काय केलं ? '

नंतर थोडा वेळ दोघेही गप्प झाले. स्वतःशीच बोलत राहिले. एकाचा शब्द दुसऱ्याला ऐकू गेला नाही. हातपंख्याच्या वाऱ्यानं की काय कोण जाणे, लामणदिव्यातील उरलेली ज्योतही गप्पकन विझली आणि सारा अंधार झाला.

' बराय येतो '—एवढंच म्हणून काशिनाथपंत उठले. बाबा वाणी किती वेळ तसाच अंधारात बसून राहिला होता कुणाला ठाऊक.

राधाबाई काशीयात्रेला गेल्या. त्या गोष्टीला वर्ष होऊन गेलं. बाबा वाण्यानं निरनिराळ्या पेढ्यांना पत्रं लिहून पाहिली. दिगंबर रामदासी आणि त्यांचे यात्रिक यांचा पत्ता कुणालाच आणि कुठेच लागला नाही.

दिवाळीसाठी आलेली गोदी लगालगा चावडीसमोर आली. काशिनाथपंत काही काम बघत होते. ते एकदम चमकले. घरातल्या बायका सहसा चावडीवर येत नाहीत. त्यातून अशा कातरवेळी. ते घाबऱ्या-घाबऱ्या उठले आणि जोत्याच्या कडेला आले. गोदी घामाघूम झालेली होती. तिला वारंवार धाप लागत होती. तिच्या गळ्यातून एक केविलवाणा स्वर मात्र निघत होता.

' काय ! ' तोंडाने ओरडत व हातांनी खुणा करीत काशीनाथपंतांनी विचारले. गोदीने खुणेनेच काही सांगितले. चावडीत बसलेल्या बाकीच्या मंडळींना ' आलोच ' एवढे सांगण्याचे भानही काशिनाथपंतांना राहिले नाही. घाईघाईने बैठकीकडे येऊन, खुंटीवरचा रुमाल तेवढा त्यांनी काढून घेतला. तो डोक्यावर ठेवला. पायात जोडा सरकवला आणि घाईघाईने पळत गेल्यासारखेच ते लेकीच्या पाठोपाठ निघून गेले.

होय, राधाबाई परत आल्या होत्या. एकट्याच. आपल्या घरात येऊन

त्या त्याच तुळशीवृंदावनाच्या कट्ट्यावर बसल्या होत्या. गोदीपाठोपाठ काशिनाथपंत परसदारी आले. राधाबाई उठल्यादेखील नाहीत. त्यांचे डोळे शून्यवत् झाले होते. मावळत्या सूर्याच्या उजेडात त्यांचे ध्यान विलक्षणच दिसले.

'राधा–तू आलीस!'— काशिनाथपंत बेभानपणे म्हणाले. एक नाही. दोन नाही. राधाबाई उभ्या राहिल्या. त्यांना नीट उठवत देखील नव्हते. त्या पूर्ण बदलल्या होत्या. मुद्रा कोळपली होती. केस विस्कटले होते. कपडे फाटके होते. अंगलट तर सर्व रस काढून घेतलेल्या चिपा-डासारखी. त्या उठल्या आणि तशाच भेलकांडत भेलकांडत आत गेल्या.

'गोदे, ही बोलत का नाही?' काशिनाथपंत वेड्यासारखे मोठ्यांदा ओरडले. मुकी गोदावरी काय सांगणार वडिलांना? तिने पाची बोटांची जुळवण आपल्या ओठाजवळ नेली. हात आणि मान होकारार्थी हालवीत खुणेने सांगितले, ती बोलत नाही. काशिनाथपंतांना काय करावे ते सुचेना. त्यांना उभ्या उभ्याच मूर्च्छा आल्यासारखे झाले!

राधाबाई गेल्या त्या दिशेनेच काशीनाथपंत घरात गेले. त्यांच्या नेहमीच्या शेजघरातच त्या अचूक येऊन पडल्या होत्या. त्यांनी पाहिलं, राधाबाईची अवस्था चिंताजनक आहे. दिगंबर एकाएकी आला होता. तशाच त्याही आल्या होत्या. तो बदलला होता. तशाच त्याही बदलल्या होत्या. मुलाबरोबर काशीयात्रेला गेलेल्या राधाबाई आज परत आल्या होत्या! एक वर्षानं आल्या होत्या! मध्ये काय घडले, याचा धागा काशिनाथपंतांना सापडत नव्हता. त्यांनी परत अनेक वेळा हाका मारून पाहिल्या — 'गोदाची आई — राधा – ऐकलंस का – ए वेडे —'

काही नाही. प्रतिशब्द म्हणून नाही. नुसते शून्याकडे पहात राहणे. बघता बघता राधाबाईच्या जिवाची तल्खील चालू झाल्याचे काशिनाथ-पंतांना दिसले. चावडीकडची माणसे नेमकीच त्यावेळी चौकशीला आली. कुठं शेजारीपाजारी गेलेल्या चनीबनी पण परत आल्या. चार दोन बायका वाट काढीत येऊन राधाबाईच्या उशा–पायथ्याशी बसल्या. त्या कुणाशी काहीच बोलेनात. त्यांना वरश्वास लागल्यासारखा झाला. डोळ्यांच्या बुबळांची वेडीवाकडी हालचाल सुरू झाली. कुणीतरी

कोणालातरी, गावातल्या वैद्याला बोलवायला पाठविले. बाबा वाणीही येऊन पोहोचला. कोण काय विचारणार आणि कोण काय सांगणार ?

हां हां म्हणता लहान थोर मंडळी, सारा गाव वाड्यात जमला. सगळीकडे बातमी उठली. राधाबाई आल्या आणि आल्या त्या भ्रमिष्ट होऊन.

भ्रमिष्टापेक्षाही भयंकर अवस्था झाली होती काशिनाथपंतांची. त्यांनी पत्नीचे डोके मांडीवर घेतले होते. ती आता आपल्याला लाभत नाही याविषयी त्यांची खात्री झाली होती. राधाबाईंनी डोळे फिरविले. त्यांच्या ओठांची काहीतरी हालचाल झाली. शब्द अर्थातच उमटला नाही. हुंदका आवरून काशीनाथपंत म्हणाले— 'अरे गंगा आणा कुणीतरी, देव्हाऱ्यावर आहे.'

गंगेचे नाव कानी पडताच राधाबाईंनी धनुर्वाताच्या रोग्यासारखी एक भीतिदायक उसळी मारली.

गंगोदकाचा गडू त्याचे तोंड फोडून कुणी तरी पंतांच्या हाती दिला. पंत त्यातील पवित्र तीर्थ मरणोन्मुख राधाबाईंच्या उघड्या ओठात घालणार एवढ्यात राधाबाई पुन्हा उसळल्या. एका हाताच्या होलपाड्यासरशी त्यांनी तो गडू उडवून दिला.

'नको' — सीमेचे कष्ट सोसून त्यांच्या वाणीतून एक शब्द उमटला. त्या बोलू लागल्या या घटनेने भानावर येऊन काशिनाथपंतांनी हलकेच त्यांचे केस कुरवाळले. अत्यंत हळू आवाजात त्यांनी राधाबाईंना विचारलं —

'गंगोदक का नको ?'

बाबा वाणी तो गडू उचलून त्यांच्या पायथ्याशी आला. राधाबाई काशिनाथपंतांकडे एकटक पहात होत्या. ओठ पुनः थरथर कापले. आपल्या क्षीण हातांनी त्यांनी पंतांचा चेहरा आपल्याकडे ओढला. कानाशी ओठ भिडविण्याची खटपट करीत त्या बोलल्या :

'माझ्या दैवी काशी नाही. गंगा नाही. मी पापिणी आहे. काशीच्या वाटेवर पाप पाहिले. दिगंबर-दिगंबर आणि प्रयागा— '

'प्रयागा आणि बुवा !' बाबा वाणी दचकल्यासारखा ओरडला.

काशीनाथपंतांचे सर्वांग कोंदटल्यासारखे झाले. त्यांच्या काळजाचा ठोका थांबल्यागत झाला. मग एकाएकी धडपड सुरू झाली. मस्तकात कोलाहल माजला.

राधाबाईंची मान उशीवरून कलंडली होती. हालचाल बंद झाली होती. तो पापाचा प्रसंग प्रत्यक्ष पाहिलेले त्यांचे डोळे – पापभीरू डोळे अजूनही उघडेच होते; पण त्यांत प्राणांचे अस्तित्व राहिले नव्हते.

◇ ◇

गावरान शेंग

ते भले मोठे गुलमोहराचे झाड लालभडक फुलांनी लहडलेलं असो, नुसत्या हिरव्याचार पानांनी डवरलेलं असो वा निष्पर्ण अवस्थेत वाळकुंजे झालेले असो. भीमा माळीण त्याच झाडाखाली बसलेली असते.

तिची अंगलट आता वार्धक्याने ओघळली असली तरी मूळची इमारत बुलंद. पुढचे दात पडल्यामुळे तिच्या तोंडाचे आता खिंडार झाले आहे. पण सदैव हसण्याच्या तिच्या लकबीने, बाईने चांगला काळ भोगला असला पाहिजे हे निश्चित ध्यानात येते. तिचा आवाज थोडा घोगरा आहे. ती बोलते हळू, पण वाटते मोठ्याने बोलल्यासारखी. तिच्या तोंडात पुरुषी शिव्या फार आहेत. दिवसभर ती बसलेलीच असते, पण कधी उठते तेव्हा ध्यानात येते की ती कमरेपासून वर, पुढे झुकलेली आहे. आणि तिचा कमरेपासून मागचा भाग जरा जास्त थुलथुलीत झाला आहे. तिचा मांसल आणि गोरा चेहरा आता सुरकुत्यांनी बाद केला आहे, पण डोळ्यांतली मजेदार चमक अजून कायम आहे.

भीमाचा धंदा आहे शेंगा विकण्याचा. बारमहा तिच्याकडे ओल्या भाजलेल्या भुईमुगाच्या शेंगा असतात. मोसमांच्या दिवसांत मक्याची कणसे, ओला हरभरा असा वाणही ती ठेवते.

एक पोत्याचे बस्कर. समोर एक डालगा. त्यात शेंगा. एक पेटलेली शेगडी आणि तिच्यात वाळू असलेली एक लोखंडी पाटी. इतकाच तिच्या दुकानाचा व्याप आहे. आल्या गेल्या कुणाही मुंडासेवाल्याला ती हटकते आणि हसत हसतच सांगते, ‘ ए भडव्या, परवाची पावली टाक की ! ’

भीमाच्या गिऱ्हाइकाला जणू तिच्या शिव्या लागतच नाहीत. ते तिच्या

जवळ येते. पाटीतल्या चार शेंगा आपल्या हातांनीच वाकून उचलते. त्या सोलून गरम गरम दाणे तोंडात टाकता टाकता बोलते, ' पगारावर देतो की भीमा ! '

'आठवणीनं दे आणि तुझ्या त्या काळ्या गडग्यालाही द्यायला सांग-' काळा गडगा म्हणजे कोण हे त्या गिऱ्हाइकाला कळते आणि ते मान हलविते. परत उधारच पावशेर शेंगा खरेदी करते. अंगरख्याच्या लोंबत्या खिशात त्या भरून खात खात शीळ घालीत निघून जाते. तिच्या बैठकीवरून जाणारा रस्ता एका मोठ्या फॅक्टरीकडे जातो, त्यामुळे तिथल्या मजुरांची गिऱ्हाइकी तिला दोन वख्ती हमखास मिळते. सकाळी सहा साडेसहाला आणि संध्याकाळी साडेचार-पाचला.

मधल्या वेळी तिला जाणाऱ्या येणाऱ्यांकडून तुरळक विक्री मिळते. नाही असे नाही, पण समोरच्या कन्याशाळेतल्या पोरी हे तिचे दुसरे मोठे गिऱ्हाइक. रोजच्या मधल्या सुट्टीत पोरींचा घोळका बाहेर पडतो. भीमाची शेंगांची पाटी रिकामी होते. आणि तिच्या बटव्यात चार पाच रुपयांचा खुर्दा सहज जमतो. भीमाची गावरान शेंग त्या मुलींच्या शाळेत इतकी प्रसिद्ध होते की मुलीमुलीत पैजा लागतात. त्यांच्या जितीची भरपाई आणि हार खाल्ल्याचा दंड भीमा माळणीच्या शेंगेत दिला घेतला जातो.

कन्याशाळेतल्या सगळ्या मुली आणि सगळ्या शिक्षिका भीमाला ओळखतात. सर्वत्र कपाळाला आठ्या घालून खाली बघत चालणाऱ्या मोठ्या बाई देखील भीमाला पाहून हसल्यागत करतात.

' राम राम बाईसाहेब ! ' थेट पुरुषी पद्धतीने भीमा नमस्कार करते.

' नमस्कार '... बाई हसून उत्तर देतात.

खालच्या वर्गातल्या मुली तर भीमाच्या फार लाडक्या. ती कुणाला चिमणी म्हणते तर कुणाला चिचुंद्री म्हणते. कुणी नवा कोरा झगा घालून आली तर भीमा कौतुकाने तिच्या झग्याचा झोळ हाताने चाचपून कपड्याचे पोत पाहते. कापड भारीच भारी वाटले तर झगेवाल्या पोरीच्या पाठीत मऊ रपाटा घालीत म्हणते, ' बुडवा बापाला ! '

तिच्या असल्या शेऱ्यांची चिमुरड्या मुलींना मौज वाटते आणि त्या

खदाखदा हसतात. एक विनोदाची कांडी झगमगली की साऱ्या घोळक्यात चंद्रज्योती पेटतात आणि निष्पाप हसण्याचे भुईनळे सर्वत्र उडू लागतात. आठवी ते अकरावीतील मुलींना मात्र भीमा ‘ अहो ’ म्हणून बोलाविते. सर्वांचीच आडनावे माहीत नसतात. पण उच्चवर्णीयातील चार सहा नावे तिला पाठ आहेत. त्यातले कुठले तरी एक घेऊन कुठल्याही मुलीला हाक मारते. गिऱ्हाईक तर मिळवतेच मिळवते पण त्या त्या मुलींना दाम न घेता वाटून टाकते.

रोजच्या मधल्या सुट्टीत मुलींचा घोळका नेहमीच भीमाच्या दुकाना-भोवती जमतो. तसाच आजही जमला होता. साऱ्यांची कमळी मात्र त्यातून दूर उभी होती. काही मुली भीमाकडून शेंगा खरेदी करीत होत्या. काही खरीदलेल्या फोडून खात होत्या. एखादीच्या लालचुटुक ओठावर जळक्या फोलाचे काळे चिकटून बसले होते. एखादीच्या गालावरच तसले काजळ लागले होते. गलबलाट, हसणी, इश्श्य– अय्याचे चित्कार, काकणांचे आवाज, वेण्यांच्या गिरक्या आणि साड्यांची सळसळ. या सादांचे एक इंद्रजाल निर्माण झाले होते. भीमा त्यात गुरफटली होती पण तिचे लक्ष मात्र बाजूला उभ्या राहिलेल्या कमळीकडे होते.

शेंगांचा हारा रिकामा झाला. भीमाच्या बटव्याचे पोट भरले. तिच्या पुढ्यात कुरतडलेल्या फोलांचा सडा झाला. तोच घंटा झाली आणि साऱ्या मुली शाळेच्या इमारतीकडे धावल्या. एका मिनिटात त्या जागेचे वातावरण निःशब्द झाले.

कमळी मात्र एक एक पाऊल उचलत शाळेच्या इमारतीकडे निघाली होती. तिला जणू धावत जाण्याची मुळीच गरज नव्हती. संध्याकाळ होताच चिमण्या झाडावर बसाव्या तशा साऱ्या मुली आपापल्या वर्गात जाऊन बसल्या. वर्ग सुरू झाले. कमळी बाहेरच घुटमळत होती.

एक एक पाऊल हळू हळू टाकीत कमळी शाळेच्या दिशेने चालली होती. भीमा तिची पाठमोरी हालचाल मोठ्या तन्मयतेने न्याहाळीत होती. कमळीच्या वेणीची रेशमी लड तिच्या पाठीवर हलके हलके रुळत होती. साडीचा पदर उजव्या खांद्यावर गोळवटला होता. चोळीच्या पट्टी-खालची तिची उघडी गोरी पाठ डोळ्यांत भरत होती. कमरेखालच्या

भागावर तरुणपणाची झाक रुंदावली होती. मंद चालण्याबरोबर त्या भागाची होणारी आवळी जावळी हालचाल मोठी मनोहर वाटत होती. भीमाच्या आवाजातला पुरुष जागा झाला की काय कोण जाणे. तिने बसल्या जागेवरूनच मोठ्याने हाक मारली.

'अहो प्रभाताई!'

विमनस्कपणे नख कुरतडत कमळी पुढे पुढे चालली होती.

'अहो लीलाताई.' भीमाने पुनः आणखी मोठ्याने हाक मारली तशी कमळीने मान वळवली. तिचे डोळे भ्यायलेल्या सशासारखे होते. जमिनीला हाताचा रेटा देऊन भीमा जागची उठली आणि लगालगा थोडी पुढे आली.

'तुम्हाला, तुम्हालाच हाक मारली!'

'मला?' कमळीने आश्चर्याने विचारले आणि भीमाच्या दिशेने ती चार पावले पुढे आली.

'ऑफ असेल तर थोडं इकडं या!'

भीमा माळणीने आपल्याला का बोलवावे हे कमळीला कळले नाही. पण ती पुढे आली, आणखी पुढे आली. शाळेच्या फाटकाजवळ त्या दोघींची गाठ पडली. भीमा तिच्याजवळ आली. पाठीवरून हात फिरवावा म्हणून उचललेला हात मात्र तिने एकदम मागे घेतला.

'शिवू?' भीमाने उगीच थोडे हळू विचारले.

'का?' काहीच बोध न झाल्याने कमळी म्हणाली—

'तुम्हा लोकात आजकाल काही पाळत नाहीत म्हणा –' कमळीला अजूनही कसलाच बोध झाला नाही.

'तसं काही नाही ना? मलूल दिसता म्हणून म्हटलं.' आता मात्र भीमाने तिच्या पाठीवरून हलकेच हात फिरवला. त्या अनोळखी प्रेमाने कमळी एकाएकी गहिवरली आणि तिला रडू दाटले.

'का हो?'

कमळीला काही बोलवेना. भीमाने तिचा हात धरला आणि तिला गुलमोहराच्या सावलीत नेली. आपल्या बस्कटावर तिला बसवून भीमा स्वतः तशीच धुळीत बसली आणि मग अतिशय प्रेमळ आवाजात

विचारू लागली–

‘ काय झालं लीलाताई ? ’

‘ माझं नाव लीला नव्हे. कमळ ! ’ नाक वर ओढीत कमळी म्हणाली. तिच्या गोऱ्या नाकपुड्या तांबड्याजाल झाल्या.

‘ पाणी देऊ का आणून ? ’ भीमाने विचारले.

‘ नको. ’ कमळीला पुन्हा हुंदका आला. ती उठू लागली. भीमाने तिला परत हात धरून बसती केली आणि एखाद्या घरातल्या वडिल माणसाने समजूत घालावी तशी ती रस्त्यावरची माळीण तिची समजूत घालू लागली.

‘ अशी रडू नको बाई. काय झालं ते मला सांग. मी तुझ्या आजी· सारखी ! ’ कमळीचे ओठ थरथरू लागले; पण तिला काही बोलता येईना. तिला परत हुंदका आला. दोन्ही हातांचे पंजे तोंडावर ठेवून ती ओक्सा· बोक्शी रडू लागली. भीमाला काय करावे ते सुचेना.

‘ कमळ, कमळ ’ करीत तिच्या पाठीवरून हात फिरवू लागली. पण कमळीला ती उबळ आवरेना, ती उठली.

‘ मी जाते, घरी जाते ’ एवढेच म्हणून ती तोंड फिरवून चालू लागली. बघता बघता ती पंचवीस पावले दूर गेली. तिला थांबविणे भीमाला शक्य झाले नाही. शाळेपलिकडे चार मजली इमारती टाकून एका बोळात शिरली. पार दिसेनाशी झाली.

कमळी घराशी आली तेव्हा ताराबाई दरवाजाला कुलूप लावून कुठं तरी जायच्या बेतात होत्या. त्या ठेवणीतले हिरवे जरीकाठी पातळ नेसल्या होत्या.

घरात असलेला एकच एक खोट्या मोत्यांचा कंठा त्यांच्या गळ्यात होता. एका काखेत रडते पोर घेऊन त्या कुलुपात किल्ली फिरवीत होत्या. कुलूप बसत नव्हते आणि काखेवरचे पोर केकटत होते.

‘ मी घेते बाबूला...’ म्हणत कमळी पुढे झाली...‘काही नको. मधल्या सुट्टीला आला असाल तुम्ही. चहा फराळाचं करून ठेवलंय तुमच्या काकोबांनी. ते खा आणि उलथा शाळेत. कहार मेला ! ’

मातृदेवता बोलती झाली आणि कमळीचे पाय गारठल्यासारखे झाले.

एक अक्षरही न बोलता ती पुढे झाली आणि रडत्या बाबूला तिने ताराबाईंच्या खाकेतून काढून घेतला. ते पोर जळवेसारखे आईला चिकटले होते. तुटता तुटेना. त्याने भयंकर भोकांड पसरले तरी कमळीने त्याला घेतलेच.

'पाच मिनिटं घेशील व पळशील शाळेत. मला बाहेर जायचं आहे.'

'मी थांबते आहे घरात!'

'नको. तुमची शाळा नको चुकायला.'

'शाळेत नाही जायचं मला!'

'का?'

'दुपारी सुट्टी आहे.'

'कोण मेलं?'

'कुणी नाही.'

'मग सुटी कसली? शाळेपेक्षा सुट्टयाच फार झाल्या आहेत मेल्या.' बोलता बोलता ताराबाईंनी दार उघडले आणि मुलीला उद्देशून त्या म्हणाल्या, 'सांभाळ जरा बाबूला, मी गायनशाळेत जाऊन येते.' बाबूची तुतारी मायलेकींच्या संवादावर वाजतच होती.

आई जिना उतरली तशी बाबूने तिच्या दिशेला झेपा टाकीत जोराने बाजा करायला प्रारंभ केला. त्याला आवरता आवरता कमळी बेजार झाली. तिने त्याला पाळण्यात घालून पाहिले. मांडीवर जोजवून बघितले. बाबूचा कर्णा मुळीच बंद होईना. कमळीला वाटले त्या पोराच्या तोंडात शाळेतले फळा पुसायचे फडके बोळा करून भरावे. मुळातच तिचे डोके ठणकत होते, त्यात बाबूचे रडू. खेड्यात बायका मुलांना अफू घालून झोपविताना तिने पाहिले होते. तशी अफू घालून बाबूला झोपवावे असाही विचार तिच्या मनात आला. तिने केले काहीच नाही. आपले पाय लांब पसरले. न्हावू घालताना तान्हे मूल ठेवतात, तसा बाबूला आपल्या पिंढऱ्यांवर पालथा ठेवला आणि पाय वर करीत ती त्याला जोजवू लागली. दोन्ही हातांनी थोपटू लागली.

बाबूच्या रडण्याबरोबरच तिचे मन आपले रडगाणे गाऊ लागले. बरं-

होतं खेड्यात. दादा उगीच शहरात आले. लहानपणी ते माझे किती लाड करीत. तेव्हा आई होती. तिच्याबरोबर माझे सगळेच सुख हरपले. घरच्या गव्हाचा सांजा आता कुठला मिळायला ? दादा तरी काय करणार बिचारे. त्यांना मिळतात ऐंशी रुपये. त्यात कसं भागणार ? ही माझी आई त्यांच्याजवळ गाणं शिकायला आली अन् हिने त्यांच्याशी लग्न कशाला केले कुणाला ठाऊक ? हा भाऊ एक झालाय आणखी दळभद्रा. खर्च वाढलाय... आईलाच पातळ घेणं दादांना कठीण जातं. मग मला कुठून घेणार ते... मी परकर नेसत होते तीच बरी होते. पातळं फार महाग पडतात. वर्गातल्या मुली किती छान छान पातळं नेसून येतात. कुसुम अरकेरीनं परवा नेसलेली ती म्हैसुरी साडी किती तलम होती. आपल्याला कुठली तसली ... मधल्या सुट्टीत चहादेखील मिळायची मारामार— तिथं कुठली पातळं न् कुठलं काय ? पण फी तरी दिली पाहिजे. बाई किती कठोर बोलल्या. आज वर्गात बसू देणार नाही म्हणाल्या. नाही तर नाही...

कमळीचे डोळे पुन्हा पाण्याने काठोकाठ भरले. पायावर पालथा पडून बाबू कण्हल्यासारखा रडत होता. तिने पदराने डोळे कोरडे केले आणि मान वाकवून पाहिले. बाबूचे डोळे मिटत चालले होते पण झोपेतसुद्धा तो रडायचे विसरला नव्हता.

तिचे कोवळे पाय थोडेसे अवघडल्यासारखे झाले, पण हलायची सोय नव्हती. बाबूने पुन्हा भोकांड पसरले असते. पाय हालवत ठेवून उगीचच ती खोलीभर पाहू लागली. ताराबाईनी सोडून ठेवलेले जुनेरे तसेच पडले होते. चुलीवर कळकटलेले चहाचे भांडे तसेच होते. खरकट्या तोंडाने कपाने बशीवर बैठक मारली होती. पायाड्यावरचे डबे उगीचच हालचाल करून जागच्याजागी थांबल्यासारखे तिला दिसत होते. मोरीत भाताची शिते असून घाण पाण्यावर तरंगत होती. डालड्याच्या जुन्या डब्यावर केरसुणी पालथी पडली होती. गणपती बसविला होता, त्या कोनाड्याचे रंगासह पोपडे निघाले होते. त्या पोपड्यांत ढेकणांनी घरे केली होती. एक ढेकूण जमिनीवरून भिंतीवर जाण्यासाठी धडपडत होता. आत बाहेर निःशब्द दुपार होती.

कमळीचे डोके रिकामे झाले होते. थोडी तल्खली होऊ लागल्या- सारखेच मात्र तिला वाटत होते. तिला भूक लागली होती. भुकेची आठवण झाल्यावर तिला एकदम हळवेसे वाटले. दुपारी सैपाकाला उशीर होता म्हणून न जेवताच ती शाळेत गेली होती. जाताना फीची शेवटची तारीख होती हे तिच्या लक्षात आले होते. वडील घरातच होते. एक मोडकी वाजाची पेटी दुरुस्त करीत ते कॉटवर बसले होते. त्यांच्याकडे फीचे पैसे मागण्याचा धीर तिला झाला नव्हता. घरचे दारिद्र्य तिला कळत होते. बाबूच्या डांग्या खोकल्याने डॉक्टरची फी शाळेच्या फीच्या तिप्पट झाली होती. ती आगाऊ भरावी लागली होती हे तिला माहीत होते. ती तशीच शाळेत गेलेली होती.

काहीतरी खावे असे तिला वाटू लागले. तिच्या जिभेखालचा भाग उगीचच ओला झाला. डोळ्यांचे कोपरे पुन्हा पाझरू लागले. बाबूला झोप लागली होती. तिने त्याला हलकेच उचलला. कॉटवरच्या गादीवर चादर म्हणून घातलेले जुने धोतर त्रासिकपणाने दूर फेकले. तर ते फेकल्यावर तिच्या लक्षात आले की धोतराच्या चौपदरीखाली गादीलाच मला मोठा भोकसा आहे आणि त्यातून विटकरी रंगाचा कापूस वर आला आहे. एका हाताने बाबूला खांद्यावर सावरीत ती धोतराजवळ गेली. कष्टाने वाकून तिने ते धोतर उचलले. एका हाताने तिला त्याची घडी मुळीच साधेना. चिडून तिने ते तसेच अंथरले. बाबूला अलगद त्यावर ठेवले. त्याच्या अंगावर माशी बसून परत त्याने भोकांड पसरू नये म्हणून तेच धोतर भेळेची पुडी करताना कागद मुडपतात तसे तिने बाबूच्या अंगावर मुडपले.

सावत्र आईच्या पातळाची घडी करून ठेवणे, चहाची भांडी घासून पालथी घालणे, मोरीतून खराटा फिरवून घेणे ही कामे तिला प्रथम करायला हवी होती हे तिला कळत होते, पण तिला आता भूक लागली होती.

पायाड्यावरच्या डब्यातून ती हुडक्या घेऊ लागली. बाजरीचे पीठ, तुरीची डाळ, मीठ याच वस्तू तिच्या हाताशी लागल्या. उचलून तोंडात टाकावे असे काही काहीसुद्धा त्या खोलीत तिला सापडले नाही

चहाच करून घ्यावा असे तिने ठरविले. डब्यात साखर तर होती. टोपात दूध होते. पण चहाच्या डब्यात फक्त यात चहा होता एवढे सांगण्यापुरती काळी धूळ होती. कमळी अगदी निराश झाली. मोरी-जवळच्या शिंक्यावरचा भोपळा फोडून खावा असे तिला वाटू लागले. पण तो विचार तिचा तिलाच मूर्खपणाचा वाटला. ती हताश झाली. खूप मोठ्याने रडावेसे तिला वाटू लागले. भिंतीला टेकून ठेवलेली एक चटईची सुरळी तिने पायाने खाली पाडली. आईचे जुनेरे उशाला घेतले आणि ती आडवी झाली. त्या भुकेल्या अवस्थेत तिला आपल्या सख्ख्या आईची आठवण झाली.

खेड्यात असतानाही काही दादा साने मोठा श्रीमंत नव्हता. पण शेतीचे थोडेबहुत उत्पन्न येत होते. देवळातल्या रोजच्या हजेरीबद्दल त्याला देवस्थानाकडून पंचवीस रुपये मिळत होते. कमळची आई तेवढ्यात टुकीनं संसार करीत होती. कमळी एकुलती एक असल्याने तिचे खूप लाड होत असत. तिच्या भातुकलीच्या लग्नासाठी देखील आई तिची खरा पुरणावरणाचा सैपाक करीत होती. कमळीसाठी खणाचे परकर ती आपल्या हाताने शिवीत होती. ती मागेल ते रांधून वाढीत होती. तीन वर्षांपूर्वीचे ते सारे सुख कमळी विसरली नव्हती. आईच्या हातच्या आमसुलाच्या साराची चव तिला अजून आठवत होती.

झोप आणि जागृती यांच्या मधल्या पोकळीत कमळी आपल्या खेड्या-तल्या घरात वावरत होती. तिची आई पोवळी गाईच्या कासेखाली बसली होती. कासंडीवर पांढरे शुभ्र फडके अंथरून त्यावर तिने कुटलेली खडीसाखर पेरली. त्यावर ती धार पिळीत होती. वासराशी बागडणारी कमळी त्याच्या शिंगाचे झाड किती उंच झाले आहे ते चाचपून पहात होती. आईने तिला हाक मारली. धारोष्ण दुधाची फुलपात्री तिने तिच्यापुढे केली. ती घटाघट ते दूध प्याली.

छप्पापाणी खेळण्यासाठी जमलेल्या शेजारच्या साऱ्या मुली कमळीच्या सैपाकघरात आल्या. आईने फोडणीच्या लाह्यांची भली मोठी परात त्यांच्यापुढे ठेवली. उखाणे घालीत घालीत त्या त्या चटकदार खाद्याचे बोकणे भरू लागल्या.

गरम गरम पुरणपोळीवर आईने तुपाची धार धरली. कमळीने तुकडा मोडला. तिच्या जिभेला गोड चुटका बसला. एक वेलदोड्याचा कण तिच्या दातात अडकला. ते दुःख देखील सुवासिक होते.

गूळखोबऱ्याचे मोदक, शेवयाची खीर, कोहाळ्याचे सांडगे, खजुराचं लोणचं. आईच्या हातचा एक एक पदार्थ जेवता जेवता कमळीचे इवले पोट अगदी जड झाले. कोठीच्या खोलीतल्या कापसाच्या पोत्यावर जाऊन ती उताणी झोपली — तिच्या पोटाला तडस लागली. भिंतीवर नखाने आपले नाव लिहिता लिहिता तिला गडीगुप्प झोप लागली.

ती सुखद स्वप्ने पाहता पाहताच आज कमळीला गाढ झोप लागली. सूर्य मावळतीला गेला. त्या अंधाऱ्या खोलीतला अंधार अधिक दाट झाला. रात्रीत एक चक्कर टाकून जाणाऱ्या गुरख्यासारखा वारा येऊन त्या उघड्या दाराची कडी वाजवून गेला! बाबू कॉटवर झोपला होता. कमळी चटईवर पडली होती. तिच्या डोळ्यांच्या कोपऱ्यातून गळालेले पाणी गालांवर सुकून गेले. त्या पाण्याचा वण तिच्या गालांवर उजेडा-वाचून चमकत होता.

'कमलताई, कमलताई' — एकदम भरडा पण प्रेमळ पुरुषी आवाज आला आणि कमळी खडबडून जागी झाली.

'कोण आहे?' तिने उठून विचारले.

दरवाज्यातून भीमा आत आली.

कमळीचा पदर पार ढळला होता. कमळीच्या छातीवरचा यौवनाचा कोवळा विस्तार भीमाच्या नजरेतून सुटला नाही.

'झोपला होता काय?'

'नाही. सहज लवंडले होते.'

'मधल्या सुटीनंतर परत शाळेत गेलाच नाही वाटतं?'

'नाही गेले — डोकं फार दुखत होतं!' कमळीने तीच चटई जरा पुढे ओढली आणि भीमाला बसा म्हटले. भीमा चटईवर बसली नाही. जमिनीवर बसली. तिने आपला ओटा जमिनीवर पालथा केला. चारपाच हिरवेगार पेरू जमिनीवर घरंगळले. कमळी प्रश्नार्थक चेहऱ्याने बघतच राहिली, तेव्हा मायाळू आवाजात भीमा म्हणाली —

'घे बाळा, तुझ्यासाठीच आणलेत.'

कमळीला नाही म्हणवले नाही. तिच्या तोंडाला पाणी सुटले. तिने पेरू उचलला आणि तो दातलीतच ती भीमाशी बोलू लागली.

'घर कसं सापडलं तुम्हाला ?'

'काढला पत्ता—'

'कसा ?'

'सांगितला तुमच्या वर्गातल्या मुलींनी! बुकाची पिशवी वर्गातच राहिली!'

'खरंच की.'

'ठेवलीय मी.'

'कुठाय ?'

'माझ्याजवळ. उद्या याल तेव्हा देईन.'

'मी शाळेत नाही येणार उद्या.'

'का ?'

कमळी थोडीशी थबकली. पण परत सावरून म्हणाली, 'तब्येत बरी नाही.'

'खोटं!'

'अं...'

'फीसाठी बाईंनी वर्गाबाहेर काढलं होतं. होय ना ?'

कमळीच्या हातातला पेरू तसाच राहिला. तिचे डोळे पुन्हा भरले. ती प्रेमळ माळीण पुढे झाली. आपल्या पदराने तिचे डोळे टिपले. हलक्या हातांनी पाठ थोपटली. आणि मऊ लुसलुशीत स्वरात ती म्हणाली, 'चालायचंच बाळा. गायन मास्तराला पगार किती मिळायचा. त्यात संसार कसा करायचा आणि पोराबाळांच्या शाळेचा खर्च कसा भागवायचा ? पुन्हा घरात सावत्रपणा. तू काही काळजी करू नकोस. अडलं नडलं मला सांगत जा. अं ?'

कमळीला काय बोलावे ते सुचेना. भीमाने एक पाचाची नोट काढून तिच्या हाती दिली आणि उठून उभी राहताच ती बोलली, 'ही दे फी उद्या. बुकं घेऊन जा तुझी. दोन वर्षानं एस. एस. सी. झालीस म्हणजे

पडेल डोला पाण्यात. मी जाते आता—फॅक्टरीचं गिऱ्हाईक येईल.'

कमळी काही बोलायच्या आतच भीमा निघून गेली. हातातला अर्धा पेरू, जमिनीवर पडलेली ताजी फळे आणि हातातली कोरी नोट याकडे कमळी पहातच राहिली. हे काय घडले हेच तिला कळेना. पण तिला उगीचच हुषारी मात्र वाटली. ती चटकन् दोन पायांवर उभी राहिली... जमिनीवरचे पेरू उचलून दोन्ही हातांवर ती चेंडूसारखी झेलू लागली...

दुसरे दिवशी साडेदहालाच ती शाळेकडे गेली. भीमाने तिची पुस्तकांची पिशवी जपून ठेवली होती.

तिने ती घेतली आणि वेणीचा शेपटा उडवीत वळताना ती लाडिकपो म्हणाली,...

'आजी, दादांचा पगार झाल्यावर परत देईन पैसे.'

लगीन झाल्यावर दे.' म्हातारी खदखदा हसली आणि गरम गरम शेंगांची एक मूठ तिनं तिच्यापुढे केली!

'आता कशाला शेंगा? मी आज जेवून आलेय!'

'ग ग, तुला काय लेकराच्या जातीला...'

तिचे म्हणणे कमळीला मोडवेना. या शाळेत आल्यापासून कैकदा तिला याशेंगा खरेदी कराव्याशा वाटत होत्या. तिच्या हाती एक आणा कुठून असणार? खरपूस भाजलेल्या त्या देशी शेंगेची सुरकुतलेली बी तिने तोंडात टाकली. तिला आईच्या हातचे पुरण आठवले.

'गोड आहे!' ती खुषीने म्हणाली—

'गावरान आहे माझ्या लेकी—'

त्या दिवसापून भीमाची आणि कमळीची चांगली मैत्री जमली. दादा, सावत्र आई, बे यापेक्षा या भोळ्या माळणीविषयी तिला अधिक माया वाटू लागली. भीमा तिला कधी सोनेरी रंगाच्या रिबीनी आणून देई, कधी मधल्या सुट्टीत चॉकलेटच्या दोन वड्याच तिच्या हातावर ठेवी...

शेंगांचा तर तिला रतीबच लागला होता. एका मधल्या सुट्टीत अशीच घंटा झाली. साऱ्या मुली पळाल्या. भीमाने कमळीला तेवढे थांबविले... ती आज कासोट्याचे नेसली होती. तिच्या गोऱ्या गरगरीत पोटऱ्या मोठ्या लोभस दिसत होत्या. भीमाने त्या नीट न्याहाळल्या. मांडीचा

गोलवाही तिच्या दृष्टीने टिपला. तिच्या नजरेचा तो अनपेक्षित रोख न कळल्याने भोळेपणाने कमळीने विचारले, ' काय बघता ? '

' शाळा सुटल्यावर सांगेन. आता जा. घंटा होऊन दोन मिनिटं झाली...' कमळी त्यावेळी शाळेत गेली, पण तिचे पुढच्या दोन तासांत लक्ष लागले नाही. शेवटची घंटा झाली आणि ती भीमाबाईकडे धावली. भीमाबाईने तिला डोळ्यांनीच ' थांब ' अशी खूण केली. साऱ्या मुली गेल्या. मास्तरणी गेल्या. शुकशुकाट झाला. तेव्हा भीमाने गार्टर्सची एक जोडी कमळीपुढे केली...

' काय हे ? ' खेड्यात वाढलेल्या त्या मुलीच्या ध्यानातच आले नाही–' हे लावत जा पातळाला. बामणी नेसण तुमचं. सोळा हात साडी न् अर्धी मांडी उघडी. '

तिच्या या फटकळ म्हणीमुळे मात्र कमळीला लाजल्यासारखे झाले. तिने पोटरी–मांडीवरचे पातळ पायांची चाळवाचाळव करून सारखे केले.

' म्हणून म्हणते हे लावत जा ! ' भीमा त्यातल्यात्यात हळू आवाजात बोलली.

' कसे लावायचे पण ? '

' माझ्या बापानं लावले होते कधी ? ' भीमा खो खो हसली.

घरी कमळीने ताराबाईंना सांगितले : या वस्तू एका श्रीमंत मैत्रिणीने दिल्या. ताराबाईंना वाटलं बरं झालं. त्यांनाही या वस्तूंची गरज होती; पण कर्मदरिद्री प्रपंचात गार्टर्स खरेदी करणेही त्यांना घडत नाही. ते गार्टर्स त्या दोघी मायलेकी वापरू लागल्या. मग भीमाने तिला कधी स्नोची बाटली दिली, कधी टोमकोचे हेअर ऑईल दिले, कधी हस्तिदंती कंगवा दिला तर कधी लाल खड्याच्या इअररिंग्ज दिल्या. मुलीने थोरा-मोठ्यांच्या मुलीशी मैत्री केली याचे तिच्या आईनाही बरे वाटले. ताराबाईंना तिच्या वस्तूंचा दुर्मिळ उपयोग घेता येऊ लागला...पाच सहा महिने हे असेच चालले. कमळीची फी दर महिन्याला भीमाच भरीत होती. घरात सांगून टाकले होते : मला नादारी मिळाली आहे.

बाबूच्या दुखण्याने साऱ्यांच्या घरात मुक्काम ठोकला [illegible] शिरला आणि सहा

महिन्यांचे घरभाडे थकले. जुन्या भाडेकरूंना काढून टाकण्याच्या इराद्याने सदाच तक्रारी करीत असलेला घरमालक कमळीच्या दारात उभा राहून अद्वातद्वा बोलला. कमळीचे वडील आणि ताराबाई अगदी अचारी का विचारी झाली.

'या महिन्याला सारंच्या सारं भाडं मिळालं तर ठीक, नाहीतर जागा खाली करा. चौपन रुपये एकदम फेडण्याचा तुमचा दम आहे का? खोलीची धर्मशाळा करून टाकलीय. सरकार एक भोसडीचं भाडेकरूचाच पक्ष घेतंय; पण आता सहा महिने होऊन गेलेत, मी दयामाया करणार नाही. सांगून ठेवतो...'

उग्र चेहऱ्याच्या घरमालकाच्या या उद्‌गारांनी दादा सान्यांचा गळा अगदी भरून आला. त्यांना काय करावे ते सुचेना. त्यांनी, जागा होऊन रडायला लागलेल्या बाबूच्याच पाठीत उगीच धपाटे घातले. ते पोर प्राणांत जवळ आल्यासारखे ओरडले. ताराबाईंनी त्याला त्यांच्या हातून हिसकला म्हणून बरे. नाहीतर त्यांनी त्या पोरट्याला त्यावेळी बेशुद्ध केले असते. दादा टोपी घालून बाहेर गेले आणि पोराला पोटाशी धरून ताराबाई मुळुमुळू रडू लागल्या. त्यांनी चुलीला पेटत घातले नाही की कमळीलाही शेगडी फुलवायला सांगितलं नाही.

साडेदहा वाजेपर्यंत दबकत दबकत कमळीने आपले सारे काम आटोपले आणि आईला न सांगताच ती शाळेकडे निघून गेली.

गुलमोहराच्या झाडाखाली कमळीची म्हातारी मैत्रीण आपले दुकान मांडून बसलीच होती. ती तिच्याजवळ गेली.

'भीमा—'

'काय?'

'तुझ्या मायेचा फायदा फार घेते मी!'

'मला कुठं लेकरं-बाळं आहेत?'

'आज एक काम करशील?'

'सांग.'

'कठीण आहे.'

'होण्याजोगं असेल तर अलबत करीन.'

' चौपन्न रुपये पाहिजेत. '

' चौपन्न ? '

' फार आहेत ? '

भीमाचा सुरकुतलेला चेहरा थोडा गंभीर झाला. डोळ्यांत मात्र कसलेसे समाधान तरळले. डालग्यांतल्या मूठभर शेंगा तिने शेंगडीवरच्या पाटीत टाकल्या. तापलेल्या वाळूवर त्या इकडे तिकडे परतत ती निश्चयाने सांगू लागली–

' शाळा सुटल्यावर तुला जरा माझ्याबरोबर यायला पाहिजे. '

' येईन की, कुठं ? '

' माझ्या घरी. माझा एक लांबचा भाचा आहे. श्रीमंत आहे तो. त्याला बोलावून घेते, तो देईल. '

' मला लवकर परत करणे जमणार नाही. ' कमळी घोटाळली.

' माझ्या घरी यायचं जमेल ना ? बस्स ! '

कमळीला अत्यानंद झाला. पाठीमागे रुळणारी वेणी या खांद्यावरून त्या खांद्यावर टाकीत ती जाण्यासाठी निघाली—

' साडेपाचच्या सुमाराला निघू ! ' भीमा म्हणाली—

' बरं ! ' कमळीनं पाठ फिरविली न फिरविली तोच भीमाने पुन्हा हाक मारून तिला थांबविले.

' कमळ– '

' काय ? '

' कपडे जरा ठाकठीक असू देत, थोरा-मोठ्याकडं जायचं आहे. '

' होय. ' कमळीला तिचे म्हणणे लगोलग पटले.

शाळेत मास्तरणी वेगवेगळे विषय शिकवत होत्या. पण कमळीचे त्यांच्याकडे मुळीच लक्ष लागले नाही. सर्व वेळ ती चौपन्न रुपयांचा आणि भीमा माळिणीच्या त्या भाच्याचाच विचार करीत होती. पाच वाजले आणि शाळा सुटली. घरी जाताना तिने शेंगा विकत बसलेल्या भीमाला दुरूनच सांगितले,

' आल्ये हं ! '

घरात येऊन तिने तोंड स्वच्छ धुतले. स्नो पावडर लावली. आईचे

ते एकुलते एक पातळ ती सकच्छ नेसली. भीमाने दिलेलेच गार्टर्स तिने लावले. आरशात पाहताच तिला वाटलं, आपण आता छान दिसत आहोत.

' आई जाऊन येते ग— ' तिने ताराबाईंना म्हटले.

' मरा. ' ताराबाईंची मनःस्थिती अद्याप निवळली नव्हती. मुलीवर संतापण्याचेही त्राण त्यांच्यात उरले नव्हते. कमळीने पायात चपला सरकावल्या आणि ती बाहेर पडली. वडिलांना मोठ्या संकटातून सोडविण्यासाठी ती आता बाहेर पडत होती. तो आनंद तिच्या सर्व शरीरात उसळत होता. मनात हेलकावत होता. डोळ्यांत खेळत होता.

गुलमोहराच्या झाडाखाली एक टांगा उभा होता. भीमाचे मोकळे दुकान टांगेवाल्याच्या पायाशी कोंबले गेले होते. आणि भीमा कमळीचीच वाट पाहत उभी होती.

' आली ! ' ती टांगेवाल्याकडे बघून म्हणाली. कमळी झपाझप पावले टाकत होती. सूर्याच्या सरत्या प्रकाशात तुरूतुरू चालणारी ती नवयौवना खरोखरीच उचलून घ्यावी इतकी सुंदर दिसत होती. ती जवळ आली तेव्हा तिच्या तोंडावरचा स्नोचा वास एकदम जवळ आला. भीमाचे सुरकुतलेले डोळे थोडे आनंदल्यासारखे झाले. उगीचच प्रेमाने अहो जाहो म्हणतात तसे म्हणत ती कमळीला म्हणाली—

' बसा– '

कमळी टांग्यात बसली. भीमा माळणीच्या मनाचा थोरपणा तिला आगळा वाटला. तो बोलून कसा दाखवावा हे तिला कळले नाही. ती नुसती म्हणाली – ' भीमा ! '

भीमाने तिच्या शेजारी बसत तिच्या पाठीवरून हात फिरवला टांगेवाला थोडा खाकरला. भीमाने त्याला एक दणकट शिवी हासडली टांगेवाल्याची व तिची दृष्टादृष्ट झाली. टांगेवाल्याने आपला डावा डोळा अर्धा मिटला आणि भीमानेही मानेला लहानसा हिसडा देत आपल्या डाव्या डोळ्याखालच्या सुरकुत्या अधिक स्पष्ट केल्या ! कमळीला ते काहीच दिसले नाही. ती आनंदात होती. तिला खात्री होती, भीमा आपले काम करणार आणि आपण वडिलांना संकटमुक्त

करणार आहोत.

त्या बकाल वस्तीत भीमाचेच तेवढे घर टुमदार होते. मंगलोरी कौलांचा लाल पदर डोक्यावर घेऊन उभी राहिलेली ती झोपडी अगदी तरुण दिसत होती. समोरच्या भिंतीला दोनच लहान खिडक्या होत्या. त्यातली डाव्या बाजूची खिडकी अर्धी मिटलेली होती. कमळी भीमाच्या मागोमाग चालत आली. भीमाने दार लोटले. दारातच बसून राहिलेली एक गुबगुबीत मांजरी म्यॉंव करून ओरडली, भीमाने तिला उचलून घेतले.

'ही माझी लेक!' भीमा कमळीला म्हणाली. मुक्या जनावरांवर देखील पोटच्या पोराप्रमाणे माया करणाऱ्या त्या माळणीबद्दल कमळीला आणखी आदर वाटला.

आतल्या खोलीत जाताच भीमाने दिवा लावला आणि ती मोठ्याने म्हणाली– ' बन्सेराव. '

' मी आलोय भीमा– ' माडीवरून एक तरणाताठा आवाज आला. शेजारच्या खोलीतून कुणातरी तरुण मुलीचा चेहरा बाहेर डोकावला आणि कमळीच्या पाठीवर अलगद हात मारीत भीमा म्हणाली—

' जा, वर जा, मी सांगितलंय त्याला. '

निःशंक मनाने त्या छोट्याशा जिन्यावरून हळूहळू चढत कमळी वर निघाली. वास्तविक तिची इच्छा होती, भीमानेही आपल्या बरोबर यावे. पण ती तसे म्हणाली नाही. तिच्या चांगुलपणाचा फायदा घ्यायचा तरी किती?

कमळी माडीवरच्या खोलीत आली. खोलीत छानदार बैठक होती. विजेच्या दिव्याला हिरवी काच होती. तिच्या पावलांची चाहूल लागताच बन्सेराव पलंगावर बसला होता तो उठून उभा राहिला. कमळी जिन्यावरून वर आली तेव्हा त्याच्या डोळ्यांतही दिवे पेटले.

नीटस बांध्याची, चापून चोपून हिरवे नेसलेली ती पोरगी खरंच फार मोहक दिसत होती. तिच्या अंगलटीचे प्रत्येक वळण इतके नमुनेदार होते की कवळणाराच्या मिठीत स्वर्गसुखच सापडावे. कमळी मुळीच बावरली नाही. तिच्या ओठांवर हसू नव्हते. पण ओठांच्या हालचालीतला

अल्लडपणा हसण्यापेक्षा गोड होता. तिच्या कानांतले तांबडे लोलक त्या हिरव्या प्रकाशात मोठे मजेदार दिसत होते. एका कटाक्षाने तिचे रूप पिऊन घेता घेता तिच्या नजरेशी मात्र बन्सीला जरा ठसका लागला. तिचे डोळे अगदी निष्पाप होते. त्यात फक्त अजीजी होती, अन्य कसलीही भावना नव्हती. तिचा मागमूस देखील नव्हता. बन्सीचे धाडस अडखळले.

' बसा ना ! ' पलंगाऐवजी एका लाकडी खुर्चीकडे बोट दाखवीत तो म्हणाला.

कमळी त्या खुर्चीवर बसली. भीमाकडे जशी ती पाहात असे तशीच ती बन्सीकडे पाहू लागली. बन्सी तरणाबांड पोरगा होता. त्याचे डोळे टपोरे होते. दोन्ही भुवया जोडणाऱ्या एका काळ्या राठ केशरेषेने त्याच्या नाकाच्या मुळाशी कपाळावर एक कमान केली होती. त्याचे ओठ हसरे होते व त्यांवर कोरलेली मजेदार मिशी छान होती. कमळीला वाटले, हा भीमाचा भाचा आपले काम खचित करील.

कमळी काही बोलली नाही. खोलीच्या हिरव्या प्रकाशात ती आजूबाजूच्या तसबिरी न्याहाळू लागली. श्रीकृष्ण मागे उभा होता आणि नुसती फुगीर चोळी घातलेली राधा आळस दिल्यासारखे हात करून त्याच्या अंगावर रेलली होती– सरोवराकाठी एक उमदा पुरुष अजीजीने उभा होता आणि चोळी नसलेल्या उरावरचा पदर लपवीत एक स्त्री आभाळातून अंतराळी वर चालली होती.

श्रीकृष्ण कदंबाच्या झाडावर बसला होता आणि खाली कितीतरी तरुण गोपी अगदी उघड्या, पाण्याने लाज झाकीत काकुळतीने उभ्या होत्या.

कमळीला कसेसेच झाले. तिच्या कोवळ्या छातीत कुठेतरी एक बारीक चमक आली आणि डोळ्याखालचा स्नायू थोडासा स्फुरण पावला. तिने आपली दृष्टी त्या तसबिरीवरून काढली आणि ती सरळ बन्सीकडे पाहू लागली. तो नोटा मोजीत होता. कमळीला अत्यानंद झाला.

' हे चौपन्न रुपये मावशीने सांगितले होते. '

कमळीने झटकन उठून ते पैसे घेतले. काय बोलावे ते न कळल्यामुळे

ती घुटमळली. उपकृताचे ओशाळे हसू तिच्या ओठांच्या कोपऱ्यांवर उमटले. तिने हात जोडले व दाराकडे निघाली. दार बंद होते.

दार बंद आहे हे लक्षात येताच बन्सी पुढे झाला. त्या दारावर आतून हलके धक्के मारीत म्हणाला... ' मावशी दार उघड-- '

जिन्यावर पावले वाजली... दार उघडले गेले. म्हाताऱ्या भीमाचा चेहरा हास्याने डवरून आला होता.

' निघाली ? ' भीमाने बन्सीलाच विचारले.

' हं. ' बन्सी अवघडल्यासारखं बोलला-

' मिळाले पैसे ? ' भीमाने कमळीला विचारले.

' हो.'

भीमाने त्या दोघांकडे आळीपाळीने पाहिले आणि आपले स्थूल अंग जरा बाजूला घेतले. कमळी जिना उतरली.

भीमाही तिच्या पाठोपाठ खाली आली.

' येत्ये हं. ' कमळी म्हणाली.

' पैसे जपून ठेव. '

' हो... '

' त.. त्यांना सांगा गेले म्हणून...' कमळी म्हणाली. भीमा मनमोकळे हसली. ' सांगते सांगते... पुन्हा भेट होईलच की. '

' हो. येईन मी पुन्हा...' कमळी म्हणाली आणि चौपन्न रुपयांच्या नोटा मुठीत दाबून ती वेगाने घराकडे निघाली...

कमळीला पैसे मिळाले होते. तिला आनंद झाला होता. पण त्या आनंदाला कसली तरी कळ दुखवीत होती. ती कसली कळ ते कमळीला कळत नव्हते. मुळीच कळत नव्हते. आपण कितीही धावलो तरी पडणार नाही असे मात्र तिला वाटत होते. तिला कसला तरी आधार मिळाला होता. नोटा मुठीत दाबून ती घराच्या दिशेने धावल्यासारखी चालत होती. शहरातल्या अंधारावर दिवे डोळे मिचकावीत होते.

◇ ◇

व्यथा

स्वतःच स्वतःला हसावं असा तो काळ होता. प्रापंचिक चिंतांनी डोकं भणाणून गेलं होतं. बाहेरून सत्कारांचा वर्षाव होत होता. लोकप्रियतेला उधाण आलं होतं. प्रत्येक दिवसाच्या प्रत्येक डाकेनं आमंत्रणं येत होती. आमच्याकडे व्याख्यानाला या, आमच्या अमक्या समारंभाचं अध्यक्षस्थान स्वीकारा. आमच्या तमक्या वास्तूचं उद्‌घाटन करा. स्नेहसंमेलनाला या. व्याख्यानमाला गुंफा, मार्गदर्शन करा. महाराष्ट्रातील मोठी माणसं एकाएकी नाहीशी झाली होती की मला खरोखरीच मोठेपण आलं होतं, हेच कळेनासं झालं होतं. खरं सांगायचं तर मी अगदी त्रासलो होतो. अकारण व्याप इतके होते की, व्यावसायिक कामांना हात लागत नव्हता. कमाईत खंड पडला होता. प्रपंचाचा गाडा अक्षरशः अडला होता. घरचा खटला मोठा. कुणाच्या फीज थकल्या होत्या. कुणाला महाविद्यालयानं आखलेल्या सहलीत सामील व्हायचं होतं. कुणाचा विवाह या वर्षी करणं आवश्यक होतं, तर कुणाची प्रकृती एखाद्या मोठ्या डॉक्टरला दाखविणं भाग होतं.

रोज येणारी डाक वाचणं हा एक अनुभव झाला होता. एखादं पत्र म्हणे : ' तुमच्यासारखा थोर कादंबरीकार मराठीत निर्माण झाला हे मराठी भाषेचं भाग्य. ' दुसरं पत्र लगेच ओरडे, ' गेल्या तीन महिन्यांत आपण हप्ते भरले नाहीत. ते त्वरित भरा, नाही तर कायदेशीर इलाज करावा लागेल. ' एक पत्र पर्वतशिखरावर नेऊन बसवी, तर दुसरं पाताळात फेकून देई.

व्यवसायातले मित्र म्हणत, ' तुम्ही हा जनतासंपर्क टाळा, नाही तर काम मुळीच होणार नाही. संबंध शिथिल होतील. नावावर धूळ साचेल. पुन्हा ' बाजार ' मिळणार नाही. ' माझं मरण मला कळत नव्हतं असं

नाही, पण सन्मान करणारांना निराश करणं मला साधत नव्हतं, मस्तकातील भणभण बरोबर घेऊनच मी वणवण भटकत होतो. भाषणं करीत होतो. हारतुरे स्वीकारीत होतो. पाहुणचार घेत होतो. आज पुणं तर उद्या कोल्हापूर, उद्या नागपूर तर परवा चांदा; मराठवाडा काय, कोकण काय, गोवा काय आणि बृहन्महाराष्ट्र काय, माझ्यां पायांना जणू चक्रं लागली होती. कुठे रेल्वेनं, कुठे एस्. टी. नं, कुठे विमानानं, तर कुठे मोटरनं मी आपला प्रवास करीत होतो.

माझी एक कादंबरी नुकतीच प्रसिद्ध झाली होती. ती लोकांना फार आवडली होती. तिला एक पारितोषिक मिळालं होतं. लोकांना आनंद झाला होता आणि मी त्या आनंदाच्या आवर्तात गवसलो होतो. दगदग फार झाली होती. प्रकृतीही कुरबूर करू लागली होती. आता कुठे तरी थांबणं भाग होतं.

दूर कुठे, राणीखेत-उटकमंडला जाणं अशक्य होतं. दामाजीचा तुटवडा होता. घरात लपून राहणं दुरापास्त होतं म्हणून मी मुंबई गाठली होती. नवं काही लिहिणं भाग होतं. लेखनाचा व्यवसाय होऊ शकत नाही, हे अनेक वडीलधाऱ्यांनी सांगून देखील मी तोच व्यवसाय करीत होतो. लेखनानं नाव मिळतं; दाम मिळत नाहीत, हा अनुभव मी रोज घेत होतो.

माझा मुक्काम मुंबईत होता. अमराठी लोकांच्या वस्तीत, एका पुराण्या वास्तूत, सातव्या मजल्यावर. इमारतीला लिफ्ट नव्हता. शेजारी सिंधी-पंजाबी होते. माझ्या फ्लॅटमध्ये मी अगदी एकटा होतो. लग्नाच्या आधी होती तसली राहणी मी आपणहून पुन्हा पत्करली होती. अर्धं वर्षं व्यर्थ गेलं होतं. आता काम केलं नाही तर अवस्था भयप्रद होणार होती, हे माझं मला दिसत होतं. मी एखाद्या आश्रमीय विद्यार्थ्यासारखं स्वावलंबन स्वीकारलं होतं. पहाटे लवकर उठत होतो. थंडगार पाण्यानं स्नान करीत होतो. उदबत्त्यांचा जुडगा जाळून वातावरणात सुगंध उत्पन्न करण्याचा प्रयत्न करीत होतो. डोक्यातला धूर बाहेर निघत नव्हता. पडसं पिकलं म्हणजे नाकपुड्या चोंदतात तसा मेंदू चोंदून गेला होता. टेबलावरचे कागद कोरे करकरीत राहत होते.

निर्मितीच्या बैठकीवर बसून मी परत चिंताच करीत होतो. मनाचं ओढाळ गुरू चौखूर सुटत होतं त्याला पकडता पकडता जीव मेटाकुटीला येत होता. क्षणकाल ते सापडल्यासारखं वाटे. दोरखंड लावण्याच्या वेळी मात्र पुन्हा हिसका मारून धावत सुटे, मनाई होती त्या कुरणातच मनमुराद चरत होतं.

आपण अकारण लेखक झालो. नुसत्या सन्मानावर काही मनुष्य आयुष्य जगू शकत नाही. कलावंताच्या कलंदर वृत्ती मला परवडण्यासारख्या नाहीत. नियतीने टाकलेल्या जबाबदाऱ्या सांभाळल्याच पाहिजेत. प्रपंच चालविला पाहिजे. मुलींची लग्नं केली पाहिजेत. मुलांना शिक्षण दिलं पाहिजे. पत्नीची हौस पुरवली पाहिजे. आप्तांची विचारपूस केली पाहिजे. यातली एकही गोष्ट माझ्या हातून ठीकपणे पार पडेनाशी झाली होती. मी वैतागलो होतो. स्वतःवरच संतापलो होतो. बरोबरीची माणसं कुठल्या कुठे गेली होती. कुणाकडे हरित क्रांती झाली होती. कुणी रजताच्या राशीवरच बसला होता. कुणी राबता राबता अधिकारपदावर आला होता. कुणी राजकारणात रमला होता. सारेजण कमवीत होते. धनिक झाले होते. ज्या वयात माणसाला काही स्वास्थ्य असणं आवश्यक त्या वयात मी मात्र खंक होतो, रंक होतो. काम केल्यावाचून या अवस्थेत सुधार घडण्यासारखा नव्हता. काम होत नव्हतं. प्रत्यक्ष जगात पराभूत असलेलं मन कलेच्या प्रांतात शिरायलाच सिद्ध नव्हतं.

आजकाल मराठीतले लेखकही धनिक झालेत. नाटककारांनी हवेल्या उठवल्या आहेत. लोकनाट्य लिहिणारांना सहस्रावधी रुपयांची प्राप्ती केवळ 'स्वामित्व' म्हणून होत आहे. काही साहित्यिक भारतीय चित्रपटसृष्टीत गेले आहेत, ते चैनीत आहेत. गाड्या उडवीत आहेत. आठवड्या-आठवड्याला परदेशच्या वाऱ्या करीत आहेत.

मी तेवढा वेगळा उरलो आहे. या स्थितीतून डोकं वर काढलं पाहिजे, लिहिलं पाहिजे; अव्याहतपणं लिहिलं पाहिजे अशी गरज होती; पण मी लिहू शकत नव्हतो. चिंता करीत होतो. चिंतांच्याच गुंत्यात अडकलो होतो. चिंता करणं हा एकच चाळा मनाला आणि डोक्याला जडला होता.

ऑक्टोबर महिना. मुंबईचा विलक्षण उष्मा. सारख्या घामाच्या धारा लागत होत्या. पंखा बापडा फिरत होता, पण त्याची अवस्था माझ्या लेखन-शक्तीसारखीच झाली होती. तो फिरत होता, पण वाऱ्याची एकदेखील रेघ उमटत नव्हती. उमटली तरी उष्म्याच्या गिचमिडीत तिचा पत्ता लागत नव्हता. अजूनही माझा हात कामाला लागत नव्हता.

संदर्भ-ग्रंथ शिणले होते. कोरे कागद विटले होते. झरणीचं टोपण मिटलं होतं.

माझ्या डोक्यात चिंताच चिंता मातल्या होत्या. लिहिणं मुळीच साधेना, तेव्हा मी उठलो. पलंगावर आडवा झालो, झोप येणंही अवघड होतं. गाढ झोप ही अनुभूती मी अलीकडे विसरल्यासारखाच झालो होतो. काहीतरी वाचावं म्हणून उशागती असलेल्या तिपाईवरचा एक ग्रंथराज उचलला. ते वाल्मीकीय रामायण होतं. उघडलं गेलं ते पान वाचू लागलो. रामायण-भारताचं वैशिष्ट्य हेच की त्यांचा रस कधी सरत नाही. वाचन सुरू झालं. मी त्यात रमलो, गुंतलो. माझ्या चिंतांचा मला थोडा वेळ विसर पडल्यासारखा झाला. पानामागे पान वाचावंसं वाटू लागलं. गद्यात भाषांतरित केलेलं ते महाकाव्य वाचताना मी समरसलो. श्रीरामांसारख्या पुरुषोत्तमाशी मी एक क्षुद्र माणूस स्वतःची तुलना करू लागलो. ते आर्ष महाकाव्य वाचताना देखील माझी मनःस्थिती पुन्हा आपलेच सूर वाजवू लागली.

आधी वनवासी, त्यात प्रिय पत्नी नाहीशी झालेली. राजवस्त्रं नाहीत. हत्ती-घोडे नाहीत. रथ नाही. पालखी नाही. पदाती नाहीत. निराश अवस्थेत श्रीराम आपल्या भावाबरोबर वनोवनी भटकत आहेत. भटकत भटतत ते पंपा सरोवर येथे पोचले. तिथे शबरी नांदत होती. भिल्लीण. राम स्वतःला दुर्दैवी माणूस समजत होते. शबरीला वाटत होतं, आपल्या अंगणात प्रत्यक्ष परमेश्वर आला. तिनं श्रीरामाला आश्रमात नेलं; षोडषोपचारे त्यांची पूजा केली. उष्टी फळं पुढे केली. शबरीचं हे अगाध प्रेम रामाला मनोभावानं स्वीकारता आलं असेल का? स्वतः राम दुःखांनी गांजलेले होते. प्रत्यक्ष पत्नीच एका राक्षसानं हरण करून नेली होती. तिचा पुनर्लाभ होणार की नाही ते माहीत नव्हतं. गहिवरल्या स्वरात श्रीरामच

लक्ष्मणाला म्हणाले होते, ' लक्ष्मणा, ही गोदावरी नदी देखील माझ्या प्रियेचा ठावठिकाणा सांगत नाही रे. राजा जनकांची भेट झाली तर मी त्यांना काय सांगू? जानकीच्या मातेला मी काय निवेदन करू ! मी राज्यहीन झालो. भावंडांपासून दूर झालो. आता सीतेला अंतरलो. लक्ष्मणा, तिच्याविषयीच्या चिंतेनं मला झोप लागत नाही. रात्री भयंकर दीर्घ वाटतात. संपता संपत नाहीत. '

श्रीरामाची अवस्था ही अशी होती आणि बिचारी शबरी मात्र हात जोडून त्याच श्रीरामाला म्हणत होती, ' रघुनंदना, तुझ्या दर्शनानं माझं तप फळाला आलं. माझी गुरुसेवा सुफलित झाली. '

श्रीरामाला हसावं लागलं असेल. वरदहस्त उंचवावा लागला असेल. श्रीरामानं तसं केलं नसतं तर शबरीला मुक्ती मिळाली नसती. पण श्रीरामाचं काय ! त्यांना स्वतःच्या दुःखाला कसा काय आवर घालता आला ? पत्नीचा ठावठिकाणा त्यांनी झाडांना विचारला. नदीला विचारला. तीही माणसंच होती, झालं !

माझं वाचन तिथंच अडखळलं. पुन्हा पेटून गिचमिड. सर्वांगावर उष्णता आणि हुळहुळणारा घाम डोक्यात गेल्यासारखा झाला. विचार चिकट झाले आहेत असं वाटू लागलं. एक पारवळ कुठेतरी घुमू लागलं. त्याचा आवाज अत्यंत कर्णकटू वाटला. मनात आलं, एके दिवशी एक एअरगन् घ्यावी आणि इथे या फ्लॅटमध्ये येणारे सारे पारवे मारून टाकावे. पारव्याच्या मांसानं म्हणे अर्धांगवायू झालेल्या रोग्याला आराम पडतो. मेंदू निकामी झालेल्या माणसाला कशाचं मांस घ्यावं लागतं कोण जाणे ! प्रश्न उमटला आणि कुणीतरी मेंदूतील चक्रच खटकन बंद करून टाकलं. विजेचा पंखा थांबला. बहुतेक विजेचा प्रवाहच बंद पडला असावा. तो बंद पडला आहे की काय हे पाहण्यासाठी उठावं लागणार होतं. मी उठलो नाही. तसाच पडून राहिलो. उष्मा होणारच होता. घाम पीडणारच होता. चिंता चुकत नव्हत्या. नवं सुचत नव्हतं. बसवत नव्हतं. झोप येत नव्हती. खिडकीतून आभाळ दिसत होतं. निळंभोर, खरखीत. पांढऱ्या देखील ढगाचा टिपूस नाही. एका ढांगुळ्या माडाचा शेंडा मान वर करून आत पाहत होता. ती मान देखील हालत नव्हती. त्याचे केस

उडत नव्हते. चित्रातल्या माणसासारखा तो स्थिर होता. माझं डोकंही अगदी रिकामं झाल्यासारखं झालं. रिकामं, कोरडं ठणठणीत. फक्त आत घामाची हुळहूळ. इतक्यात 'किर्रकिर्र–किर्रकिर्र' असा आवाज झाला, थांबलेला पंखा पुन्हा स्वतःभोवती फिरू लागला. त्याचा आवाज क व्हावा एवढंच माझ्या डोक्यात आलं. डोक्यातूनच कुणी तरी दोन्ह ओढल्या आणि माझे ओठ अलग झाले. माझं मलाच हसू आलं डोअर-बेल वाजली, तिचा तो आवाज होता. तो पुनः पुन्हा होत राहिला.

दाराशी कुणीतरी आलं होतं. मुंबईचे भिकारीही मोठे मिजासखोर असतात. मजले चढून वर येतात. डोअर-बेल वाजवतात. दार उघडलं गेलं की देणेदारासारख्या रुक्ष शब्दात म्हणतात, 'एक दहा पैसे द्या साहेब, गरीब माणूस आहे मी!'

रद्दीवाले, फेरीवाले, जरीपुराणेवाले, कुणीही डोअर-बेल वाजवतोय. बेल पुन्हा वाजली. आता उठणं भाग होतं. उठवत नव्हतं तरी मी उठलो. अंग दुखत होतं. डोकं तर सुन्नच होतं. चडफडतच मी प्रमुख दाराशी गेलो. डाव्या हाताच्या खिडकीची दारं बाहेरच्या बाजूला उघडी झाली होती. एका कवाडावर तो पारवा बसला होता. त्याच्या शेजारी त्याची मादी होती. दुपारच्या भयाण वेळी, चांदण्यात चालावं तसं त्यांचं प्रेमगीत चाललं होतं. घुटुरघू घुटुरघू—

पारवा आणि डोअरबेल यातून अधिक कर्कश आवाज कोणाचा होता तो बंद करण्यासाठी मी धावलो. दाराची खिट्टी गच्च झाली होती. बंद दारावर हात दाबून ती बाहेर लोटल्यासारखी केली तेव्हा खिट्टी निघाली दारं खाडकन् उघडली तशी पारवली पंख फडकावीत उडाली. दूर गेली

मी समोर पाहिलं. दाराशी एक सुंदर स्त्री उभी होती. तिचं सौंदर्य सौम्य होतं. त्याला लावण्याचा भपकारा आला नाही. सोनचाफ्याच्य फुलासारखा मंद सुवास दरवळला. तिची अंगकांती सोनचाफ्यासारखी होती. बरीच चढण चढल्यामुळे ती जरा थकली होती. श्वासाची गत थोडीशी वाढली होती, पण आपण दमलो आहोत हे तिनं दर्शविर नाही, लपविण्याचा प्रयत्न केला. एवढ्याशा रुमालानं तिनं त्वरे

आपलं कपाळ टिपलं आणि हात जोडून ती म्हणाली, 'माफ करा हं. न कळवता आले मी.'

'या ना, आत या.' मी म्हणालो व दारातून बाजूला झालो. ती आत आली. वारा मुळीच नव्हता तरीही एक गार झुळूक आल्याचं जाणवलं. मी दार लावणार एवढ्यात ती म्हणाली, 'राहू देत उघडं. भाऊ येताहेत.'

'भाऊ?'

'भाऊसाहेब जोशी. 'प्रतिनिधी'चे संपादक.'

'अच्छा, अच्छा!'

भाऊसाहेब मला माणूस होता. त्याचा माझा उत्तम परिचय होता तो आजन्म ब्रह्मचारी, सर्वोदयी. मग ही त्याची कोण? बहीण? माझ्या मनात प्रश्नोत्तरी सुरू झाली. 'मी आपट्यांची बहीण—' बैठकीच्या खोलीकडे जाता जाता तिनं आपली ओळख सांगितली.

'आपटे?'

'आपटे. म्हापशाला खाण आहे त्यांची. ऑयर्न ओअर..'

'हं. हं. भय्यासाहेब आपटे...'

त्या आपट्यांचा नि माझा चांगला परिचय होताच. या स्त्रीसारखाच सुंदर चेहरा. असंच मनमोकळं हसू. फरक एकच. या स्त्रीचे दात पांढरे स्वच्छ. भय्यासाहेबांच्या काही दातांवर सोन्याच्या मेखा मारलेल्या आहेत.

'आपट्यांची माझी चांगली ओळख, मडगावला गेलो होतो तेव्हा भेटलो होतो.'

'त्यांची बहीण मी. सुहासिनी भावे!'

'या.'

त्या बाई आणि मी माझ्या बैठकीच्या खोलीत गेलो. त्या हसत होत्या, पण त्या हसण्यात मर्यादा होती. एकूणच त्या बाईंचं दर्शन सुरेख आणि संयमी होतं. तशा वयानं त्या प्रौढ असाव्यात, पण त्या प्रौढत्वानं लावण्याची कोवळीक हरवलेली नव्हती. त्या एक सुरेख शेवाळी रंगाचं पातळ सकच्छ नेसलेल्या होत्या. त्या पातळावर पांढऱ्या जरीच्या पुसट चौकटी

होत्या. मिळत्या रंगाची पण थोडी गडद अशी चोळी त्यांनी अंगात पेहरली होती. त्या चोळीवर एकच एक मोत्याचा हार होता. पावडर, ओष्ठरंग—असली प्रसाधनं त्या मुळीच वापरीत नसाव्यात, त्यांच्या रूपातलं सुरेखपण अस्सल होतं. पाहणाऱ्यानं पाहत रहावं, पण डोळ्याला डोळा भिडताच नजर झुकवावी असा त्याचा थाट होता.

त्या आणि मी समोरासमोरच्या आसनांवर विसावलो न विसावलो तोच भाऊ जोशी आले.

'या.' मी म्हणालो.

भाऊ नेहमीसारखेच कसल्या तरी घाईत असल्यासारखे दिसत होते. न बसताच ते आपल्या पद्धतीनं बोलू लागले, 'ह्या भावे वैनी. बाळासाहेब भाव्यांच्या पत्नी. भाव्यांची बदली झाली नुकतीच दिल्लीला. ह्या इथे असतात. महिला समाजात व्याख्यानाला बोलवायला आल्या आहेत तुम्हाला !'

झालं. नको तेच पुन्हा वाढून आलं. त्या बाईच्याविषयी वाटलेला सद्भाव एकाएकी विचलित झाला. भाऊ जोशांचाही संताप आला. पण करतो काय ?

लांब लांब केस असलेल्या आपल्या पापण्या उंचावून सुहासिनीबाई माझ्याकडे पाहत होत्या. नकार देणं अशक्य झालं.

'केव्हा ?'

'बुधवारी.'

'पुढच्या ?'

'हो.'

'मग ठीक आहे.'

कार्यक्रमाची जागा वगैरे मी विचारून घेतली. त्यांनी आभार मानले. जाताना म्हणाल्या, 'समारंभ उरकेपर्यंत संध्याकाळ होईल.'

'होऊ द्या.'

'जेवण घ्यायचं आमच्याकडे.'

'पण...'

'पण काय ?'

' भावेसाहेब इथे नाहीत ना ? '

' नसेनात. मी आहे. माझा मुलगा आहे. भाऊ आहेत. '

' मी यांच्याकडे राहतो गेली पाच-सात वर्षं. '

' ठीक आहे. '

' Thanks हं. ' त्या पुन्हा म्हणाल्या.

गडबडे भाऊसाहेब आणि ती सुहास्यवदना पुरंध्री दोघंही निघून गेली. मी दार बंद केलं. वाटलं स्वतःच्या दोन मुस्कटात मारून घ्याव्यात. ज्याचा पुरा कंटाळा आला आहे, ज्याच्यामुळे आपल्या कामात खंड पडतो ते मी नव्यानं कशासाठी स्वीकारलं ?

मेंदूत खदखद झाली. मीच मला हसलो. ' त्या बाईसाठी ? '

' हॅट् ! '

' हॅट् काय ? '

' माझ्या मित्राची बहीण आहे ती. '

' नाही कोण म्हणतं, पण तिच्या येण्यानं आनंद वाटला. कंटाळला होतास ते पुन्हा करण्याचं अभिवचन देऊन टाकलंस. '

गोष्ट खरी होती. एका भेटीनंच त्या बाईविषयी माझं मत चांगलं झालं होतं. ती स्त्री खरोखरच भाग्यवान होती. माहेर श्रीमंत, सासर धनिक. प्रौढ वयातही मोहक राहावं असं सौंदर्य. पती मोठा अधिकारी. मुलगा आहे. एखाद्या त्यागी कार्यकर्त्याला वर्षानुवर्षं आसरा देण्याइतकं औदार्य आहे. समाजसेवा करण्याइतकी उसंत आहे.

त्यापुढचा सारा आठवडा मी त्या बाईविषयीच विचार करू लागलो. असा विचार करता करता मनातला बैल उगाच उंडारला. उलटा चाल करू लागला. या स्त्रीलाच साऱ्या सुखाचा का लाभ व्हावा ? ती सुंदर का असावी ? तिचंच सौंदर्य सदा टवटवीत का राहतं ? तिलाच योग्य पती का मिळावा ?... संख्येनं अल्प असून तिचंच संतान सुदृढ का असावं ? ...

समाजकार्याची हौस तिला वाटणं अगदी स्वाभाविक आहे. आम्हांला नाही वाटत. उष्मा कमी झाला नाही. घामाची खाज कमी झाली नाही.

माथ्यातला गोंधळ निवळला नाही. लिहिण्याचं अडकलं ते अडकलं. आठवडा संपला आणि तो बुधवार उजाडला. सकाळपासून दिवस जळत राहिला. संध्याकाळची राखदेखील उष्णतेचाच धूर ओकत होती.

ठरल्या वेळी सुहासिनीबाई आपली गाडी घेऊन मला नेण्यासाठी आल्या. भाऊही बरोबर होते. मी कपडे करून तयार होतो. स्वतःवर चडफडत होतो. पुन्हा असले कार्यक्रम स्वीकारायचे नाहीत, अशी प्रतिज्ञा पुनः पुन्हा करीत होतो.

भाव्यांची गाडी भली मोठी, लांबलचक आरामशीर होती. मला त्या प्रौढ पौर्णिमेशेजारी बसावं लागलं. तोच व्यवस्थितपणा. तोच विनय. तीच प्रसन्नता. साऱ्या वागण्याला तोच एक सोनचाफी सुगंध.

'आमच्या सभासदांना फार आनंद झालाय.' सुहासिनीबाई म्हणाल्या.

मी उगीचच भुवया वर केल्या.

'आपण येताहात म्हणून!'

'बोलण्याची एक पद्धत आहे झालं.'

'नाही हं. आपलं सारं साहित्य वाचतात त्या.'

'ठीक आहे.' मी बोलणं वाढविलं नाही. त्याही मग हातातल्या छोट्या रुमालाचा उंदीर बनविण्यात गुंगून गेल्या.

ते सभागृह म्हणजे एक प्रमदवनच होतं. समाजातल्या उच्च थरातल्या पाचसहाशे स्त्रिया त्या ठिकाणी जमल्या होत्या. साऱ्यांचेच वेष मोहक होते. इंद्रधनुष्य आणि वीज यांनीच जणू त्या सभेचं सर्जन केलं होतं. निरनिराळ्या छटांनी रंगवलेले ओठ. निरनिराळ्या पद्धतींनी माळलेले कचभार. निरनिराळ्या पद्धतींची नेसणी. अनेक गती. काही मंद, काही जलद. कुणाच्या अवघ्या हालचालींनाच नृत्याची लय, कुणाची गती मंथर, तर कुणाची मोहक. तो कोलाहलही श्रवणीय होता. ती गती दर्शनीय होती. सुहासिनीबाई त्यांच्यापैकीच एक होत्या, पण त्यांच्यापेक्षा वेगळ्या होत्या.

औपचारिक भाषणं झाली आणि मी नेमका तोच विषय बोलण्यासाठी निवडला. 'स्त्रीनं सुंदर राहावं पण प्रदर्शनीय दिसण्याचा प्रयत्न करू

नये. ' विषयाच्या ओघात मी खूप काही बोललो. कदाचित चार वाक्यं काव्यात्मकतेचाही रंग घेऊन झरली असतील. सभा प्रसन्न होती. मीही खुषीत होतो. चिंता विरल्या होत्या. त्या सभेच्या आधीच्या गोष्टी आठवत नव्हत्या. पुढे घडणाऱ्या गोष्टींचा विचार मनात मुळीच नव्हता.

कॉफीपानाच्या वेळी अनेक स्त्रियांनी येऊन मला धन्यवाद दिले. सभा यशस्वी झाली. भावेबाईंनी एक निःश्वास टाकला. कार्यकर्त्यांचा निरोप घेऊन आम्ही त्यांच्या घराकडे निघालो.

तीच मोटार ... तीच प्रौढ पौर्णिमा– तेच मंद हसणं ... तोच विनय...

' मोठी दिसते संस्था तुमची ? ' मी उगीचच विचारलं.

' मोठी म्हणजे ? मुंबईत पहिल्या क्रमांकाची. या अध्यक्ष झाल्यापासून काम फार वाढलं आहे. किंडरगार्टन स्कूल निघालं संस्थेच्या मालकीचं. मोठी लायब्री आहे. ड्राइंगचे, बाटिक पेंटिंगचे वर्ग आहेत...तो हॉल संस्थेचाच..' भाऊ बोलत राहिले.

' आता सोडणार आहे पण मी अध्यक्षपद भाऊ. ' सुहासिनीबाई म्हणाल्या.

' का ? ' मी विचारलं.

' जमत नाही. '

' न जमायला काय झालं ? सुस्थिती आहे. उसंत आहे. अंगात चैतन्य आहे. समाजसेवा हे तुम्हा लोकांचंच काम. ' असं बोलावं असं माझ्या मनात आलं. मी बोललो मात्र नाही.

' तुम्हाला कोणी जाऊ देणार नाही. ' भाऊ कौतुकानं म्हणाले.

भाव्यांचा बंगला तर अतिशय मनोहर, चहू बाजूंना उत्तम बगीचा. मधे बैठीच पण नव्या धर्तीची इमारत. जिकडे तिकडे कमालीची स्वच्छता: फाटक उघडणारा माळीदेखील स्वच्छ कपड्यांत होता. बागेतले रस्ते स्वच्छ. हिरवळीवर पाण्याचा शिडकावा. फुलांचा दरवळ. दिव्यांचा झगझगाट मुळीच नाही. गाडीतून उतरून आम्ही बंगल्यात प्रवेश केला. तेव्हा सुहासिनीबाईंचा मुलगा स्वागतासाठी पुढे झाला. मुलगा अगदी मातृमुखी. असंच हसणं, तोच विनय.

‘ बी. एस्सी. करतोय— ’ भाऊंनी माहिती दिली.

‘ वा ! ’ मी उद्गारलो.

‘ याना ! ’ तो मुलगा म्हणाला. आम्ही क्षणकाल बाहेरच्या दालनात बसलो. भितीवरची चित्रं, भूमीवरचा गालिचा साऱ्या साऱ्या वस्तूंत बाईचं शालीन व्यक्तिमत्त्व दृग्गोचर होत होतं. सिगरेटस् विझविण्यासाठी ठेवलेली मांडी देखील कलात्मक होती. पाठीवर पोकळी असलेली एक पितळेची बेडकी तर मला फार आवडली. सिगारेट ओढायच्या आधी ती बेडकी मी उचलली व तिचे डोळे चाचपू लागलो. बेडकीच्या डोळ्यांच्या जागी कसले तरी भटबटीत मणी बसविले होते.

‘ छान ! ’ मी बोललो.

‘ आईनं आणलीय ती बेडकी–ग्वाल्हेरहून ! ’

‘ उत्तम आहे. ’

मुलाला आईविषयी अत्यंत आदर आहे हे तेवढ्यातल्या तेवढ्यात मला जाणवलं. वैतागी मनानं एकाएकी आवडीच्या झाडावर कुऱ्हाड उगारली. सारीच सुखं या एका स्त्रीला का बहाल करून टाकली परमेश्वरानं ? सुस्थिती नसती तर ही कशी उत्तम घर बांधू शकली असती ? कशी काय इतकी व्यवस्था ठेवू शकली असती ? आयुष्य निश्चित आहे म्हणून कलाप्रेम जिवंत आहे.

मी निश्चित असतो तर काही अनमोल साहित्यिक सर्जन केलं असतं, पण मला चिंता आहेत. त्या चिंतांची कुणी पर्वाही करीत नाही. माझ्या व्यथा मी उरात कोंडायच्या. लोकांना हसत सामोरं व्हायचं. ते कसं जमणार ? आतून घंटीचा मधुर आवाज आला. सौ. भाव्यांचा मुलगा उठून उभा राहिला आणि नम्रपणानं म्हणाला, ‘ चलायचं. ’

आम्ही चारच जण जेवायला बसलो. भाऊ, मी, सुहासिनीबाई, त्यांचा मुलगा. नोकरानं वाढण्यास सुरुवात केली. आम्ही टेबलावर जेवत होतो, पण खापराच्या बशांत नाही. चांदीची ताटं, चांदीच्या वाट्या. प्रत्येक पदार्थ रुचकर लागत होता. माझ्याच्यानं राहवलं नाही, ‘ श्रीखंड फार छान झालं आहे. ’

‘ आईनं केलंय स्वतः ! ’ सुहासिनीबाईचा मुलगा म्हणाला. त्या

माझ्यासमोर बसल्या होत्या. आता एवढ्यात त्यांची मुद्रा उगीचच बावरल्यासारखी झाली होती. मुलगा बोलला त्याच्याकडेही त्यांचं लक्ष नव्हतं.

‘ भावे मोठे भाग्यवान गृहस्थ दिसतात. ’ मी म्हणालो.

‘ निःसंशय. ’ भाऊ म्हणाले.

‘ हे ऐश्वर्य, अशी पत्नी, असा मुलगा...’

आतून कुणाच्या तरी रडण्याचे स्वर आले. सुहासिनीबाईंच्या मुद्रेवर एकाएकी कसले तरी ढग आल्यासारखे झाले. त्यांची अस्वस्थता मला जाणवली. त्यांचे ऊर उगाचच धपापू लागले. दोन्ही उरोजांमध्ये असलेल्या केवड्याच्या पानदुमडीवर दंव तरारलं. त्यांनी काही खूण केली की काय न जाणे ! त्यांचा मुलगा एकाएकी टेबलावरून उठला. बेसिनजवळ जाऊन त्यानं हात धुतले. घाईनं कोरडे केले व तो आत पळाला.

‘ काय हवं आपल्याला ? ’ स्वतःला सावरीत त्यांनी मला विचारलं, ‘ वड्या आवडल्या कोथिंबिरीच्या ? ’

‘ हं ! ’

‘ वड्या घे रे रघुनाथ. ’ त्यांनी वाढणाऱ्याला सांगितलं.

‘ पण मुलगा उठला का ? गेला कुठे ? ’ हा प्रश्न मी विचारू शकलो नाही. भाऊही उगीच गंभीर झाल्यासारखे झाले. मला काहीच बोध होईना. पुन्हा आतून तसलाच आवाज आला. आवाज रडण्याचा नव्हता, ओरडण्याचा होता, पण तो माणसाचाच होता की आणखी कुणा प्राण्याचा होता ते कळेना.

आता मात्र त्या प्रौढ पौर्णिमेवर काळे ढग आले. खुर्चीतल्या खुर्चीत ती अस्वस्थ हालचाल करू लागली.

‘ हवं ते घ्यायचं हं. ’

‘ मी लाजतो थोडाच ! ’

बोलण्याचे प्रयत्न होत राहिले, पण संवाद रंगला मुळीच नाही. एका सुखद, सुसंगत कथेला उगीच रहस्यकथेची कळा आली. जेवण होईतो सुहासिनीबाई उठल्या नाहीत. त्यांचा मुलगाही परतला नाही. तो आवाज सारखा येत राहिला. मीही अस्वस्थ झालो. हात धुतले. पुसले.

' भाऊ, सुपारी द्या ना त्यांना. '

निर्व्यसनी भाऊंनी सुपारीचं भांडं शोधलं आणि बाई लगबगीनं आत गेल्या. जाताना बाईनंच म्हणाल्या, ' आले हं–'

बाहेरच्या दालनात आम्ही दोघेच बोलत बसलो. मी आणि भाऊ जोशी. कोपऱ्यातल्या साइड बोर्डवर एक गमतीचं झाड होतं. त्याला मक्याच्या लाह्या लागल्या होत्या, फुलं लागावीत तशा.

' चांगली आहे कल्पना. ' मी म्हणालो.

' खेड्यातली. या खेड्यातल्या आहेत वहिनी. बाभळीच्या काट्यांना मक्याच्या लाह्या खोचल्या आहेत. खेड्यात मंगळागौरीला करतात असली झाडं शोभेची. '

झालं. आमचं बोलणं मध्येच खंडित झालं. भाऊंसारख्या निवृत्त माणसालाही अस्वस्थता आली हे मला पुन्हा जाणवलं.

' थंड वाटतं नाही इथं ? ' मीच प्रश्न विचारला.

' पश्चिमेचा वारा येतो समुद्रावरला. '

' कोजागिरी चांगली साजरी होत असेल. '

' गेल्या वर्षीच रात्रभर गाणं झालं होतं. भावेसाहेब इथे होते तेव्हा.' पुन्हा शांतता. भाऊही काही बोलेनात.

' जायचं असेल तेव्हा सांगा हं. गाडी तयार आहे...' दाराशी आलेला ड्रायव्हर म्हणाला. मी उठलो.

' जाऊ या आता. '

' वहिनी–वहिनी–' भाऊंनी हाका मारल्या. तीन-चार हाका मारल्या तरी आतून उत्तर आलं नाही. तो आवाज मात्र येत राहिला. थोड्या वेळानं सुहासिनीबाई लगबगीनं बाहेर आल्या. तेच हसू, तीच प्रसन्नता, तोच संयम.

' निघालात ? आता साहेब आले म्हणजे या. त्यांना फार आवडतं आपलं साहित्य. '

मी हात जोडले. बाईंनी हात जोडले. मी पोर्चकडे वळलो.

' तुम्ही पोचवायला जाता भाऊ ? ' सौ. भावे जोशींना म्हणाल्या.

' कशाला ? ड्रायव्हर सोडून येईल की ! '

'असं कसं ?'

'मीच आले असते...'

'काही नको.' मी उत्तरलो.

ड्रायव्हरनं दार उघडलं. मी आत बसलो. भाऊ चटकन माझ्या शेजारी बसले. गाडीनं वेग घेतला. बराच वेळ आम्ही एकमेकांशी काहीच बोललो नाही. आतल्या बाजूनं येणारा आवाज, मुलाचं मध्येच उठून जाणं आणि भावेबाईंची अस्वस्थता याचाच विचार माझ्या मस्तकात चालला होता. भाऊंना विचारणंही बरं दिसलं नसतं. मी स्वस्थ बसलो. सिगरेटही नव्हती खिशात. भाऊंकडे असणं शक्यच नव्हतं. माझी अस्वस्थता भाऊंच्या लक्षात आली.

'सिगरेट पाहिजे ना ? च् च्. वहिनींनी उंची सिगरेट्स आणून ठेवल्या होत्या तुमच्यासाठी. विसरल्या त्या...'

'भाऊ, एक विचारू का ?'

'मला माहिती आहे तुम्ही काय विचारणार ते !'

भाऊ थोडंसं थांबले. मग मंदपणे बोलू लागले, वास्तविक ते फार त्वरेनं बोलतात. शब्दाचा पाय शब्दात अडकतो आणि अर्थ भुईसपाट होतो. आता ते हळू बोलत होते. शब्दन् शब्द स्वच्छपणे बोलत होते, 'तीच एक व्यथा आहे यांना, नाही तर या स्त्रीसारखी सुखी स्त्री नाही जगाच्या पाठीवर.'

'व्यथा ?'

'जन्माची. जन्म संपण्यापूर्वी ती व्यथा संपेल तर बरं.'

भाऊंचा स्वर कडू झाला होता. मी बोललो नाही. काही विचारलं नाही. तेच सांगू लागले,

'हा मुलगा आहे ना त्यांचा सतीश—त्याच्या पाठीवरची एक मुलगी आहे. सोळा वर्षांचं वय झालं तिचं. तिला चालता येत नाही. बोलता येत नाही. नुसती रडते...'

'तिचाच होता का तो आवाज ?'

'हं. तिचं बौद्धिक वय तर अजून पाच वर्षांचंच आहे.'

काय म्हणावं, काय बोलावं तेच मला सुचेना. माझ्या व्यथा या

मानानं सामान्य होत्या... या व्यथेची कळ भयंकर होती... एका मातेच्या मनाचा विचार केला तर...ती व्यथा फारच भयंकर होती. जन्माची व्यथा...कदाचित जन्म संपेल आणि ती व्यथा मागे राहील... ती व्यथा मागे राहील.

◇ ◇

वीज

आमच्या गावचा तात्या गुरव मुलखाचा पिसारी. एवढ्यातेवढयाने तावडतोब चिडायचा आणि जानवे तोडून लिंबाजीबुवा व्हायचा. तिरसट माणसाला ' तात्या गुरव ' म्हणायची पद्धत अजूनही आमच्या गावात आहे; तात्याला मरून बरीच वर्षे झाली, पण गावात त्याचे नाव राहिले आहे.

तेव्हा तो जिवंत होता. मारुतीच्या देवळापासून शंभर कदमांवर त्याचे दोन आकण्यांचे माळवदी घर होते. कुटुंबात माणसे ईन मीन तीन. तात्या, त्याची बायको गीता आणि मुलगा तुकाराम. तात्या मारुतीला पाणी घाली. कण्हेरी-रुईची फुले वाही. रात्री गाभाऱ्यात दिवा लावी. दिवसभर गावकऱ्यांसाठी पळसाच्या, वडाच्या पानांच्या पत्रावळी लावीत बसे. गीता देवळाचा सोपा दर शनिवारी सारवून काढी. गावात हव्यकव्य असेल त्याच्या घरी पत्रावळी नेऊन पोचवी. मारुतीपुढे ठेवलेले पैसे, तांदूळ जमा करून आणी; आणि आपला फाटका प्रपंच समाधानाने चालवी. सकाळी गावात बेल-तुळशी वाटायचे काम मात्र तुकारामाकडे असे. तो सकाळी दिवस उगवायला आंघोळ करून बाहेर पडे. गावात शेसवाशे उंबरा. तेवढा फिरे. फुले-तुळशीचा पुडा दारात फेकी. मायबहिणी त्याला बुचकुलीभर पीठ घालीत. पिठाची टोपली नऊच्या आत घरी येई. त्याच पिठाच्या भाकरी गीता थापी. प्रपंच हा असा चालला होता. कुणाच्या अध्यात नाही, मध्यात नाही असे हे कुटुंब होते. स्वतःच्या हातात चिपाडाची छडी रुतली, एवढ्या निमित्ताने का होईना, पण तात्या मात्र दिवसातून शंभरदा चिडे, तुक्या–गीताला धपाटे घाली. पण ती गोष्ट त्या दोघांच्या आणि साऱ्या गावाच्याही सरावाची झाली होती. तो एक नित्याचा प्रकार होता. त्यात कुणाला काही विशेष वाटत

नव्हते.

तुक्या अठरा वर्षांचा झाला तरी त्याला ' ग-म-भ-न ' देखील ठाऊक नव्हते. बेलाच्या झाडावर चढणे, काटे चुकवून त्रिदळ तेवढाच बेल खुडणे एवढे कसबच काय ते त्याने उभ्या आयुष्यात आत्मसात केले होते. एकदा दोनदा गावातल्या कृष्णामास्तरच्या शाळेत तो गेला होता. तिथे पोरांनी त्याची भारी टर उडविली होती. तेव्हापासून शाळेचाच तेवढा उंबरा त्याच्या पायाला कधीही लागत नसे. तात्यानेही त्या बाबतीत त्याला काही सांगितले नाही. कारण त्याच्याही आयुष्यात शाळा आणि शिक्षण हा प्रकार संभवला नव्हता.

दुपार नुसती जळत होती. खंडोबाच्या माळावरच्या चिमखड्यांच्या फुटून लाह्या होतील इतके ऊन तावत होते. नेप्ती-बोराड्यांच्या फांद्या चित्रासारख्या स्तब्ध होत्या. बघताच डोळ्याला अंधारी येऊन उन्हात चित्रविचित्र रंगांच्या उलट्यापालट्या रेघोट्या सरपटत होत्या. सारा माळ निर्मनुष्य, भकास होता. खंडोबाच्या देवळाच्या पडक्या भिंतीला टीचभर सावलीत देवाचा रेडा अंग दाटून बसला होता – बाकी सारा शुकशुकाट. तापलेले खडे आणि माती तुडवीत दूरवरून तुकाराम येत होता. त्याच्या पायात काहीच नव्हते. माथ्यावर पळसाच्या पानांनी भरलेला एक मोठा हारा होता. एखाद्या थकलेल्या जनावरासारखा मोठमोठ्याने उच्छ्वास टाकीत तो गावाकडे येत होता. त्याच्या पाठीवर चांगले दोन कलिंगडां-एवढे आवाळू होते व छातीवरही तसाच भोपळ्याच्या आकाराचा मांसाचा गोळा. ही अनावश्यक उपांगे परमेश्वराने त्याला का दिली होती कोण जाणे. तुक्या चालू लागला म्हणजे नेहमीच दबल्यासारखा चाले. अठरा वर्षांच्या वयातही त्याची उंची चार फुटांवर चढलेली नव्हती. ती ओंगळ आवाळे तापली म्हणजे त्याचे प्राण कासावीस होत. आजच्या उन्हाच्या माऱ्यात तो नाइलाजाने सापडला होता. पाटलांच्या घरी सत्यनारायण होता, आणि रात्री शंभर पान उठणार होते. तात्या गुरव शेरडी घेऊन बाजाराला गेला होता. पाटलांची मागणी पुरवण्याचे काम अर्थातच गीता आणि तुक्या यांच्यावर पडले होते. घरात पळसाचे एक पानदेखील शिल्लक नव्हते. दूर पाच मैलांवर काटेवनात पळसाची झाडे

होती. तिथून पाने आणण्यासाठी गीतानेच तुक्याला धाडला होता. मोठ्या कष्टासायासाने तुक्या पावले उचलीत होता. कधी एकदा घर येते असे त्याला होऊन गेले होते. माथ्यावरचा हारा फेकून देऊन खंडोबाच्या टाक्यात गार आंघोळ करावी असे तुक्याच्या मनात आले. त्याचे पाय कापू लागले होते. तोंडाला फेसाटी आली होती. उरापोटावरची आवाळे तडतडू लागली होती. पण तो थांबला नाही. घरी जायला उशीर झाला तर गीता हरणकाळजी करीत बसेल, पत्रावळी वेळेवर तयार होणार नाहीत, पाटील चिडेल, आणि ते तात्याला समजले म्हणजे तो आईल, गुरासारखी मारील, आपल्या आवाळांवर फोका ओढील. जिवाच्या कराराने तुक्याने खंडोबाच्या टाक्याचा मोह टाकला. ओंजळभर पाणी-देखील तो प्याला नाही. टाक्याला वळसा घालून वाळवंटात चुकरे उंटाचे पिल्लू चालावे तसा तो पुढे चालू लागला.

वेशीवर असलेल्या प्राथमिक शाळेला मधली सुट्टी झाली होती. चिंचे-खालच्या पटांगणात पोरे उधळ्या घालीत होती. धगुरड्या पोरांनी तेवढ्यातल्या तेवढ्यात बेदुलाचा डाव मांडला होता. एक पोर उजव्या हाताने कान धरून बसल्या गतीने एक बेदूल टोपरीत बदीपर्यंत नेत होता आणि बाकीची त्याच्यामागे नाचत ओरडत होती, " टोपर ग पुंगे टोपर ! "

त्यातल्या एकाने येणाऱ्या तुक्याला पाहिले आणि शिमग्यातले सोंग पाहिल्याच्या अवखळ आनंदात तो ओरडला, " उंटाचं पिल्लू आलं रे, उंटाचं पिल्लू आलं ! "

साऱ्या पोरांचे डोळे वेशीकडे वळले आणि क्षणार्धात बिचाऱ्या तुक्याची अवस्था कुत्र्यांनी वेढलेल्या भिकाऱ्यासारखी केविलवाणी झाली. भुवया ताणून, आंवढा गिळून तो गप्प राहिला. पुढे चालू लागला. पोरे त्याच्यामागे लागली. त्याचे आवाळू चाचपू लागली. त्याच्या हाऱ्यातली पाने पिपाणी करण्यासाठी काढून घेऊ लागली. तुक्याला अगदी भोवळल्यागत झाले होते. माथ्यावरच्या हाऱ्यासकट तो कोसळायच्या बेतात होता. एवढ्यात घंटा खणखणली – आणि जमलेली सारी भुतावळ पाठीला पाय लावून शाळेकडे पळाली. जाताना एका पोराने

एक फुटका बेदूल उगीचच तुक्याचे नाक नेमून मारला. तुक्याच्या नाकावर तो अचूक लागला. तुक्या कळवळला. मारणारे पोर टाळ्या वाजवीत शाळेच्या दरवाजाकडे धावले आणि मग तुक्याची सुटका झाली.

गीता लेकराची वाटच पहात होती. तुक्या येताच ती घाईने पुढे झाली. त्याच्या माथ्यावरचा हारा तिने उतरून घेतला, आणि 'फार ताप झाला ग माझ्या लेकराला!' – म्हणून त्याचे घामेजले तोंड तिने कुरवाळले. तसे घामात मिसळलेल्या रक्ताने तिचे हात लालसर-ओलसर झाले. तुक्याच्या नाकातून रक्त वाहत होते.

'काय झालं रे?'

तुक्या काही न बोलता खाली बसला. मागल्या भिंतीशी त्याने डोचके टेकले आणि एक दीर्घ निःश्वास सोडला. तो तोतरा होता. बोलताना त्याला फार यातायात पडे. एका वाक्यात तो तीन–चारदा थांबे.

'काय झालं रे? पडलास कुठं?' पदराने त्याच्या तोंडावरचे रक्त पुशीत गीताने घाबरून विचारले.

'पाणी!' तुक्या एवढेच बोलला. गीता 'आणते' म्हणून आत धावली. तुक्याने धाप टाकली. डोळे खूप रुंद केले. मिटल्या मुठीने ओठाच्या कडेला आलेला फेस पुसला आणि तो धडपडून उठून उभा राहिला. कसेबसे त्याने अंगातले फाटके कुडते काढून फेकले आणि त्याच्यावरच पालथा पडून तो धसमसून रडू लागला. रडतानासुद्धा त्याला विलक्षण त्रास होत होता. वरधाप लागत होती. प्राण घोटाळल्यागत होत होते.

जळून जळून काळ्याकुळकुळीत पडलेल्या जस्ती डब्यातल्या गरम पाण्याने तुक्याने आंघोळ केली. आईच्या जुनेराच्या घडप्याने अंग पुसले. हातावर गोपीचंद उगाळला आणि त्याचा टिकला कपाळावर लावण्यासाठी म्हणून त्याने भिंतीत खोवलेल्या भिंगात पाहिले. फार भयाण चेहरा होता त्याचा! खवडे होऊन डोक्यातले केस ठाई-ठाई गेलेले, निरुंद कपाळ, तुरळक केसांच्या भुवया, मिचमिचे डोळे, फेफाणे नाक, जाड-जाड ओठ आणि या साऱ्या कुरूपतेवर मोड्यांनी मारलेले असंख्य विद्रूप ठिगके. तुक्याने तोंड वळविले आणि कपाळावर कुठेतरी

गंधाचा टिकला लावून टाकला. भिंतीतले भिंग अगदी लहानसे, बैलाच्या झुलीत असते तेवढेच होते. त्यामुळे तुक्याला स्वतःच्या चेहऱ्याचा विद्रूपपणा तेवढा जाणवला. उरापाठीवरची विद्रूपतेची गाठोडी त्याच्या दृष्टीतून सुटली. गीताने त्याला हाक मारली आणि सांगितले, ' तुकारामा, देवावर तेवढे पाणी घालून ये राजा, मग घासभर खा न् झोप. फार ताप झालाय तुला ! '

हातात एक पाण्याचा तांब्या, त्या तांब्यावरच बाहेरच्या अंगावर चंदनाच्या गंधाचा चोथा आणि रुईची फुले. तुक्या मारुतीची पूजा करण्यासाठी निघाला होता – ' देवाची पूजा कशासाठी करायची ?– काय भलं केलंय देवानं आपलं ? शरीर हे असं पंगू केलंय, बाप तो तसला तिरसट ' — देवाच्या कनवाळूपणाच्या कथा त्याने देवळात चालणाऱ्या पुराणातून मोप ऐकल्या होत्या– ' त्या साऱ्या खोट्या असतील. मी देवाचं काय केलं आहे म्हणून तो शाळेतल्या पोरांकडून माझी फजिती करवतो ? मी पळसाची पानं आणायला गेलो म्हणजे उन्हाचा तडाखा वाढवितो– ' असल्या काही विचारांबरोबरच तो देवळाच्या दिशेने जात होता, तो थबकला.

देवळाच्या अलीकडच्या अंगाला काशा जौंदाळाचे घर होते. त्याचे परड्डू देवळाच्या पायवाटेजवळ येई. परड्याला कुंपण होते. बाभळीच्या काट्याच्या आतले सारे दिसे. अडुळशाच्या झुडपाच्या आडोशाला जौंदाळाची सून पाणी न्हात होती. ती विवस्त्र होती. दुपारच्या वेळी खेड्यात कुणी येत जात नाहीत. कुणब्याच्या बायका अशा बिनघोरी न्हातात. ऐन वयातली गोरीपान पोर ! तुक्या थांबला. त्याच्या वयाने त्याच्या अधू अंगात वीज खेळवली. जौंदाळाची सून उभी राहिली. जोराचा श्वास ऐकू आला, म्हणून तिने पाऊलवाटेकडे पाहिले, तो तुक्या दृष्टीला पडला. तुक्या मनात खूप हबकला. पण तिच्या चेहेऱ्यावरचा भाव रतिमात्र पालटला नाही. कुणीही माणसाला लाजेल ! तुक्या म्हणजे जणू जनावर. ती त्याच्याकडे पाहून तिरस्काराने हसली आणि पाठमोरी झाली. तिच्या काळ्याकुळकुळीत मोकळ्या केसांचा ओला थाट गोऱ्या पाठीवर निथळत होता. तुक्याच्या अंगातली वीज सणसणली—त्याला

वाटले, – ' जाऊन त्या ओल्या केसांत तोंड घुसमटावं, छातीवरची ती बेलफळं- ' – तुक्या तिथून हालला. त्याला तसे उभे राहाताना बापई माणूस पाहता तर त्याने त्याचे कुबड दगडाखाली ठेचले असते—

देवळात जाऊन तुक्याने मारुतीवर पाणी ओतले. त्याच्या कुरूप चेहेऱ्यावर कुठेतरी गंधाचा टिकला लावला. गंधावरच एक फूल चिकटवले, आणि मघाच्या गोरेपणाच्या कैफातच तो देवळाच्या पायऱ्या उतरला. तो जरा जलद चालत होता. पाय पोळताहेत हे त्याच्या लक्षातही येत नव्हते– ' तिची आंबोळ संपली नसेल तर जाता-जाता तिला आणखी थोडीशी पाहावी. आपल्याला कोणी लाजत नाही हे एक-परी बरेच. डोळ्यांना तरी भरपूर थंडावा मिळतो – ' त्याच्या बोलण्या-सारखेच त्याचे विचारही अस्पष्ट आणि त्याला स्वतःला फार तापदायक होत होते. तो चालत होता. जौंदाळ्याच्या घरड्याजवळ तो आला तेव्हा ओली नागीण आपली हिरवीगार साडी परड्याच्या कुपावर वाळत घालीत होती. तिचे केस मोकळे होते. तिचा रसरशीत चेहरा तुक्याच्या बाजूलाच होता. काळेभोर डोळे, सरळ नाक, लुसलुशीत गाल, हनुवटीवर चुटुकले गोंदवण– तुक्याचे डोळे दिपले. तिचे केस मोकळे होते, पण आता ती चोळी ल्यायली होती. तिने काहीतरी आडवे लावले होते. तुक्या थांबलेला तिच्या लक्षात आला—अगदी सहजपणे तिने विचारले, ' झाली का पूजा, तुकाराम ? '

तुकाराम कष्टाने ' हो ' म्हणाला आणि चालू लागला. त्याच्या अंगा-तली वीज बिथरली होती. त्याला नाही तिकडे नेत होती.

...जौंदाळ्याच्या घरात– भर दुपारी—त्यानं ओल्या केसांत तोंड खुपसलं– त्याच्या तोंडावरच्या मोड्या साफ निघून गेल्या, आणि रंग नितळ सावळा झाला – उरापाठीवरची आवाळे गळून पडली – तुकाराम आणि ती ओली नागीण...

तो घरी पोहोचला. गीता पत्रावळी लावीत होती. ती उठली. तिने त्याला जेवायला वाढले. त्याला जेवण गेले नाही. आईने अर्थ लावला, ' उन्हानं काहिली झाली. त्यानं अन्न जाईना पोराला. ' हात धुण्यासाठी तो बाहेर गेला. दारातल्या बेलाच्या झाडावर दोन बेलफळे स्तब्ध लटकत

होती, भोवती हिरवीगार पाने दाटली होती. तुकारामाच्या अंगातील वीज बरळू लागली- हिरवी साडी हिरवी पानं-बेलफळं- आपली आवाळं- '

तो इतका शिणला होता, ऊन एवढेच तापत होते, तरी त्याचा डोळा लागला नाही. डोळे मिटून तो स्वस्थ वाकळेवर आडवा झाला होता. गीता विळयाने चोयट्या कापीत होती. त्याला वाटले, ' याच विळयानं आपली आवाळं जखम न होता अलगद कापली जावीत. भर दुपारच्या प्रहरी जोंदाळयाच्या कुंपणावरून आपण हरणासारखी उडी घ्यावी. ओल्या केसांत तोंड घुसमटावं आणि- '

तो सारखा या कुशीवरून त्या कुशीवर वळत होता. मधेच तो उठून बसला—

' झोप येत नाही का रे ? ' गीताने विचारले.

' नाही ! '

' ऊन फार तावतंय ? '

' हं ! '

तुक्या दारातून समोर पहात होता. दारासमोर आलेल्या बेलाच्या आडव्या फांदीवर दोन चिमण्या होत्या. दोन बेलफळे लटकत होती. काळया डोक्याची चिमणी, तांबूस डोक्याच्या चिमणीच्या पाठीवर बसून पंख फडफडवीत होती. खालची चिमणी लाडिक चिव चिव करीत होती- काळया डोक्याची उतरून पलीकडे जात होती. परत पंख फडफडवीत होती. अलीकडे येत होती. परत दुसऱ्या चिमणीच्या पाठीवर बसत होती. परत पंख फडफडवीत होती. खालची चिमणी लाडिक चिवचिव करीत होती. चिमण्यांच्या या खेळात वारा नसतानादेखील हिरव्या पानांतली ती बेलफळे अलगद हालत होती. तुक्या पुन्हा आडवा झाला. त्याचे सारे अंग जळ-जळत होते, खंडोबाच्या टाक्यात जाऊन पडावे असे त्याला झाले होते. तो तळमळत होता. मध्येच बैलासारखा जोरजोराने उच्छ्वास सोडीत होता. बाहेर ऊन तावत होते, आत आग पेटली होती. तुक्याला झोप येणे शक्यच नव्हते- तो तसाच तळमळत राहिला.

ऊन तसेच भयंकर रखरखत होते. बेलाच्या झाडाची सावली त्या उन्हात वाकडीतिकडी तळमळत होती. तुकाराम घामाघूम होऊन, धापा

टाकीत दाराशी आला, तो दाराला कुलूप. शेजाऱ्याकडे त्याने चौकशी केली, पण गीताने किल्लीही ठेवली नव्हती. तुकाराम खूप चडफडला. त्याला वाटले, धोंडा घेऊन कुलूप चेचावे. बळ असते तर त्याने हिसकून ते तोडून काढले असते. चेचावे तरी कसे ?– कुलुपाचे पैसे वाया जातील, आणि तात्या आपल्या कुबडावर निर्दयपणे फोका ओढील. त्याला काही सुचेना. एवढ्यात त्याच्या लक्षात आले, त्याच्या जानव्यालाही किल्ली आहे. ती किल्ली होती देवळाच्या कुलुपाची. चिडलेल्या तुक्याने संतापून तीच त्या कुलुपावर चालविली. झीट येईतो वाकडीतिकडी फिरवली आणि कसा कुठे खटका जमला कोण जाणे, घराचे कुलूप पटकन निघाले. तुक्याला अत्यानंद झाला आणि त्याच क्षणी त्याच्या मनातल्या विचाराने त्याच्यावर विरजण घातले. कुलूप कुठे दुखावले तर नाही ? – दार उघडायचं सोडून तो कुलूपच डोळ्याशी धरून पाहू लागला. तोच मागून गीता आली. तिने हाक मारली, ‘ तुकाराम – ’

तुकाराम जागा झाला. गीता केर काढीत होती. तिच्या पत्रावळी विणून झाल्या होत्या. त्यांचा गठ्ठा व्यवस्थित बांधून तिने कोपऱ्यात ठेवला होता.

‘ तुकाराम ! ऊठ बाळा. दिवस मावळायला आला. चूल भर आणि या पत्रावळी पाटलांच्या वाड्यात पोचवून ये. मग ‘ वाढून ’ मिळेल ते आणायला मी जाईन. ’

स्वप्नातल्या कुलुपाचा प्रकार तुक्याला कळला नाही. त्याला झोप चांगली लागली नव्हती एवढं खरं. जौंदाळाच्या सुनेचे गोरेपणच त्याच्या झोपेत मिसळले होते. अंगातली वीज अजून नाचत होती. थयथयाट करीत होती.

तो उठला. चूल भरली. पत्रावळींचा भारा घेऊन पाटलांच्या वाड्याकडे निघाला. जाताना तो मुद्दामच जौंदाळाच्या परड्यावरून गेला. ती हिरवी साडी वाळली तरी तिथेच होती. मागचे दार बंद होते. अडुळशाचे झाड वाऱ्याबरोबर झुलत होते, पण त्याला बेलफळे नव्हती. ती साडी बघताच तुकारामच्या अंगात पुनः कसलातरी झटका आला. त्या झटक्यासरशी तो पुढे झाला. माथ्यावरच्या पत्रावळीचे ओझे पेलून, मागे पाहत पाहत

त्याने त्या साडीला स्पर्श केला. अंगातली वीज डोळ्यांपुढून मस्तकात शिरली. त्याचे सारे अंग शहारले. त्याला वाटले, आपण जौंदाळाच्या सुनेच्या मांडीलाच चिमटा काढला. या कल्पनेलाच तो भ्याला. मागे सरला आणि पुन्हा त्या साडीकडे वळून पाहत अंगातली वीज अंगातच कोंडून तो पाटलाच्या वाड्याकडे निघाला.

पाटलाच्या वाड्यात सोप्याला सत्यदेवाची कथा ऐन रंगात आली होती. माणसे बरीच जमली होती. तुक्या समोरच्या दरवाजातून आत गेला नाही. कुणी थट्टा करायचे आणखी. परसदाराने गेला. परसदारी दोन तरण्याबांड पोरी रहाटावर पाणी ओढीत होत्या. त्या दोघींच्याही पाठीवर मोकळे केस होते. त्यांतल्या एकीची साडी हिरवीगार होती. त्या दोघीजणी काही बोलत होत्या. संध्याकाळच्या शीतल प्रकाशात तुक्या ते पाहत होता. त्याच्या डोक्यातली वीज गरगर फिरत होती. त्याचे काळीज वर-वर ओढत होते. पोहरा वर येऊन, हिरव्या साडीची तरुणी तो घंगाळात ओतणार तोच तुक्याकडे तिचे लक्ष गेले –

‘ ई ऽऽ ’ ती भिऊन चरकली. भ्यायल्यानंतर ती इतक्या चलाखीने हालली, अशी सुंदर लचकली, की तुक्याला वाटले, तिला तशीच धरून ठेवावी.

‘ अगबाई ! असला कसला माणूस हा ? ’

ती बुजरी पोरगी किंचित तिरस्काराने आणि बऱ्याचशा अनुकंपेने बोलली, ‘ पाठीवर ग काय आहे याच्या ? ’

‘ आवाळू आहे ! ’ पाटलाच्या सुनेने आपल्या पाठराखणीला सांगितले.

‘ एवढं मोठं ? ’ बुजरीने आपली कमानदार भुवई वर उचलीत विचारले.

‘ करणी देवाची ! ’ पाटलाची सून म्हणाली.

‘ हाडं नसतात आवाळूत ? ’

‘ कोण जाणे ! बघ हवी तर ! ’ बेफिकिरीने पाटलाची सून म्हणाली.

ती बुजरी धिटाईने पुढे झाली, आणि गोगलगाय चाचपताना होईल तितका चेहेरा वाकडा करून तिने त्याची पाठ चक्क चाचपून पाहिली.

तिचा स्पर्श होताच तुक्याला शिरशिरी आली. अंगातली वीज सारखी उशापासून पायथ्यापर्यंत अस्वस्थपणे भिरभिरू लागली. ‘या पत्रावळी –’ एवढेच सांगून तो परसदारानेच बाहेर पडला.

एखादा पेटलेला काजवा अंधारातून द्रुतगतीने जावा तसा तुकाराम जात होता. त्याचे मन कोकलत होते–देवाची करणी!–देवाची करणी माझ्यापुरतीच अशी विद्रूप का –त्या जौंदाळाच्या सुनेला त्याने ओल्या हळदीचा रसरशीतपणा दिला, पाटलाच्या सुनेला उतू जाईल इतकं रूप दिलं, बुजरीला हरणासारखे गोड डोळे दिले न् मला ही आवाळं—

विचारांच्या गतीसहच तो जौंदाळाच्या परसाजवळ आला. त्या ओल्या नागिणीची साडी काटे-कुंपणावर वाळत होती. तुक्याच्या डोक्यात पुन्हा कसलीतरी सणक उठली. अंधार हळूहळू उतरत होता. जौंदाळाच्या घराचे मागचे दार बंद होते. अवतीभवती माणूसकाणूस कोणी नव्हते. चावडी-मागच्या दावणीत बांधलेला खोंड डरकत होता. एक खिलारी गाय दूर पडलेली चिपाडे चगळीत होती. जिवाचा घडा करून तुकारामाने ती साडी काट्यावरनं काढली. तिचा बोळा काखेत मारला आणि जन्मात धावली नसती इतक्या जलदीने त्याने धूम ठोकली.

गीता देवळाकडे जायला निघाली होती. ती तुकारामाला म्हणाली, ‘आलास पत्रावळी देऊन? मी देवळात जाते, दिवा लावते न् तिथनं तशीच जाते पाटलाच्या वाड्यात. रात्री कीर्तन आहे. दुपारचा नैवेद्य आहे तो तू खा. मला यायला मध्यान होईल!’

‘हं!’ तुकाराम म्हणाला आणि घराच्या चौकटीतून सटक्याने आत शिरला.

त्याला जेवण सुचले नाही. पुढच्या खोलीतच आधाशीपणाने त्याने एक तरट अंथरले, त्यावर त्या साडीची चौपदरी अंथरली. दार लावून घेतले. आणि उन्हाने हैराण झाल्यावर खंडोबाच्या गार तळ्यात अलगद डुबकी मारावी तशी त्याने त्या अंथरुणावर मारली. जौंदाळाच्या सुनेचे ओले लावण्य, बुजरीचा नाजुक स्पर्श, तिच्या भुवईची कमान, बेलफळाचा कठीणपणा –पिकलेल्या निंबुण्याची आंबट चव, नाना गोष्टी तो अनु-भवीत होता. उन्हात तापलेल्या चिमण्या मातीत गडबडा लोळतात, पंख

फडफडवितात तसे करीत होता—

लिंबाच्या मोहराचा वास, गव्हाच्या लोंब्यांवरचा ओलसर वारा, दिवाळीतली पहाट — त्याच्या अनुभूतीत ही सारी सुखे एकत्र आली होती. आपले अवघड अंग तो मनमुराद लोळवीत होता. हळूहळू लोटांगण थांबले. त्याच्या अंगातली शीरन् शीर शिथिल झाली. पानाआडची बेल-फळं करकचून आवळून त्याने फेकून दिली. त्रिदळ बेल तेवढे तोडले— त्याचा भारा छातीशी धरून तो परतला -- त्याला गाढ झोप लागली.

सकाळी चावडीवर बोभाटा झाला. जौंदाळाच्या सुनेची साडी चोरीला गेली. गावरखवालदार तलाश घेऊ लागले. ओल्या नागिणीने तुक्याचाचा वहीम घेतला. बापू रामोशी गुरवाच्या घरी आला — तेव्हाही तुकाराम गाढ झोपला होता. बाजाराहून परतलेला तात्या गुरव शेरडीचे चाळीस रुपये गीताला मोजून देत होता.

'तात्याबा!' रामोशाने हाक दिली.

'काय?'

'तुकाराम कुठायता?'

'निजलाय अजून! का हो?' गीता म्हणाली.

'पाटलांनी बोलावलंय!' रामोशी बोलला.

'मी येतो की—' तात्या.

'नाही. त्याच्याकडंच काम आहे!'

'अजून कसं झोपलंय कुवडं हे!— तुक्या, तुक्या — उठ की लेका — तुक्या —' तात्याच्या कर्कश हाकांनी तुक्या जागा झाला.

दारातून आत आलेली गोड उन्हे थंडीतल्या शेकासारखी त्याला सुखद वाटत होती — त्याने उठून आळस दिला —

'तोंड धू न् चावडीकडं जा. पाटलांनी बोलावलंय —' तात्या खेकसला.

तुकाराम मुकाट्याने उठला.

उंबऱ्याशी बसता-बसता एकदम चमकून बापू रामोशी 'हीच ती साडी!' ओरडला.

'म्हणजे?' तात्या बोलला.

'जौदाळाच्या सुनेची ही साडी चोरली तुमच्या लेकानी.' अंथरुणाला शिवून बापू रामोश्याने ती साडी उचलली !

पिसारी तात्याचा तोल एका क्षणात सुटला. आत जात असलेल्या तुक्याला त्याने बावळे धरून मागे खेचला, आणि तोंडाने लाख शिव्या मोजीत त्याला पडेतोपर्यंत मारला. तुक्या एक अक्षर बोलला नाही. कष्टाने हुंदके देऊन तो केविलवाणे रडत होता. कुंभाराने चिखल तुडवावा तसा तात्या त्याला तुडवीत होता.

जखमी गिधाडासारखा तुक्या चावडीच्या कोपऱ्यात निपचित पडला होता. पाटील गीताला जाब विचारीत होते. त्यांनाही तुक्याची कीव आली होती. मुद्देमाल सापडला होता. तुक्या बेशुद्ध होता. गीताला तर तोंडच नव्हते—

' हे असं कसं केलं ग यानं, गीता ? ' पाटलांनी विचारले.

रडून-रडून डोळे सुजलेली गीता कपाळावर हात मारून अपराधी आवाजात बोलली, ' देवाची करणी ! '

◇ ◇ ◇

मराठी
पॉकेट बुक्स
■ ■ ■
सव्वा रुपया

निवडक कथा

वि. स. खांडेकर
ना. सी. फडके
आचार्य अत्रे
ग. दि. माडगूळकर

■ ■ ■

संपादक
राम कोलारकर

